## पेणकरांनी केली दरेकरांची बोलती बंद

**पेण :** माजी विरोधी पक्षनेते तथा भाजपचे प्रवक्ते आमदार प्रवीण दरेकर यांनी शुक्रवारी (दि. ३) भाजप कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीनंतर पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. त्या पत्रकार परिषदेमध्ये पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांमुळे आ. दरेकारांची बोलती बंद झाली. मुळात, पेणमध्ये तीन लाख मतदार असून, त्यातील ५० टक्केच मतदान होणार असून, ते भाजपालाच होईल, असा दावा दरेकरांनी केला आहे. परंतु, त्यांचा हा दावा हास्यास्पद असून, कोणतीही आकडेवारी व्यवस्थित न घेता फक्त हवेत बाण मारुन फुशारकी मिरवण्याचा प्रयत्न दरेकरांनी केला. परंतु, पत्रकारांनी केलेल्या •› पान ५ वर

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ४ मे २०२४

किंमत ४ ₹

## सुषमा अंधारे आज म्हसळ्यामध्ये

**अलिबाग :** इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचाराच्या निमित्ताने म्हसळ्यामध्ये शनिवारी (दि.४) प्रचार सभा आयोजित केली आहे. सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास ही सभा शेकापचे नेते पंडित पाटील, शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. म्हसळामधील पाभरे येथे ही सभा घेतली जाणार आहे. सभा सुरू होण्यापूर्वी म्हसळा बसस्थानक येथून भव्य रॅली काढण्यात येणार आहे. इंडिया आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी रॅलीसह सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन म्हसळा तालुका चिटणीस संतोष पाटील यांनी केले आहे.

# तटकरेंना पाडण्याची ताकद तुमच्या हातात




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

देशात, राज्यात सध्या घाणेरडे राजकारण सुरु आहे. भाजप सरकार आपल्या ताकदीच्या जोरावर धर्मा-धर्मात, जाती-जातीमध्ये वाद निर्माण करीत आहे. परिवारामध्ये फूट पाडत आहेत. हक्क, अधिकार बळकावण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. तुमचे हक्क, अधिकार अबाधित राखण्यासाठी संविधान, लोकशाही टिकली पाहिजे. देश वाचवणे तुमच्या हातात आहे, येत्या सात मे रोजी इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना मशाल चिन्हावर भरघोस मतदान करुन विजयी करा, तटकरेंना •› पान २ वर




### प्रलोभनांना भुलू नका

देशात गलिच्छ राजकारण सुरु आहे. देशातील, लोकशाही



संविधान धोक्यात येऊ लागले आहे. रायगड लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते आहेत. या निवडणुकीत मुस्लिम समाज हाच विजयाचा गाभा राहणार आहे. संविधान वाचवण्यासाठी सर्व पक्ष एकत्र आले आहेत. मतदारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये, असे आवाहन पंडित पाटील यांनी केले. अनंत गीते यांच्यासारखा सच्चा उमेदवार इंडिया आघाडीला मिळाला आहे. गीतेंवर एकसुद्धा भ्रष्टाचाराचा आरोप नाही, ते निष्कलंक असून, मोठ्या मताधिक्क्याने त्यांना निवडून द्या, असे आवाहनही त्यांनी केले.

### ही लढाई अस्तित्वाची : गीते

रायगड लोकसभेची निवडणूक तुमच्या-आमच्या अस्तित्वाची असणार आहे. ही लढाई भ्रष्टाचाराविरुद्ध सदाचार अशी असून, गद्दारांविरोधात आहे. देशामध्ये चोर पावलांनी हुकूमशाही येण्याची शक्यता आहे. त्यामुळे रायगडची जनता सुजाण आहे. येत्या सात मे रोजी मशाल •› पान २ वर

### अब की बार भाजप तडिपार : जगताप


गोरगरीब, शेतकरी, कष्टकरी, दीन दुबळ्यांना केंद्रबिंदू मानून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचंड मेहनत घेत भारताची घटना तयार केली. समानता, न्यायावर आधारित असलेल्या या संविधानाला नष्ट करण्याचा प्रयत्न सुरु आहे. ही निवडणूक म्हणजे एक युद्ध आहे. •› पान २ वर

## आ. सरनाईकांच्या कुटुंबाचा अपघात

# नऊ महिन्यांच्या मुलासह पाच ठार

**। अकोला । वृत्तसंस्था ।**

विधानपरिषदेचे आमदार किरण सरनाईक यांच्या कुटुंबातील कारचा शुक्रवारी भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये आ. सरनाईक यांच्या कुटुंबातील व्यक्तींसह पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये आ. सरनाईक यांचे पुतणे रघुवीर सरनाईक यांचा समावेश आहे. तर, जखमींवर अकोला रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. दोन वाहनांची समोरासमोर



धडक झाल्यामुळे हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

या अपघातात किरण सरानाईक यांचे पुतणे रघुवीर सरनाईक (२८) यांचा मृत्यू झाला आहे. तसेच शिवाजी आमले (३०) सिद्धार्थ यशवंत इंगळे (३५), तसेच एका नऊ महिन्यांच्या मुलासह पाच जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातामध्ये तीन जण जखमी झाले आहेत.




### 'प्रत्येक शेतकरी करोडपती होणार'

**। पेण । प्रतिनिधी ।**

भविष्यात तिसरी मुंबई आपल्या जिल्ह्यात होऊ पाहात आहे, त्यामुळे आपल्याला जमिनी विकायच्या नाहीत. प्रत्येक शेतकरी हा भविष्यात करोडपती होणार आहे. साधारणतः एकरी ६० कोटी एवढा भाव मिळणार आहे. आपण या तिसऱ्या मुंबईच्या विकासाचे भागीदार होणार आहोत, असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी केले. पेण येथील •› पान २ वर

# हा आचारसंहितेचा भंग नाही का?

- **आ. जयंत पाटील यांचा निवडणूक आयोगाला सवाल**
- **अलिबाग-विरार बहुउद्देशीय प्रकल्पाचा मोबदला वापट सुरू**

**। पेण । प्रतिनिधी ।**

अलिबाग-विरार बहुउद्देशीय प्रकल्प ठाणे आणि रायगड जिल्ह्यात प्रस्तावित असून, या प्रकल्पासाठी संपादित करण्यात



आलेल्या जमिनीच्या मालकांना मोबदला वाटपाचे काम सुरू आहे. निवडणुकीच्या काळात मोबदला वाटप करणे म्हणजे आचरसंहितेचा भंग नाही का, असा सवाल शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी निवडणूक आयोगाला केला. तात्काळ पैशांचे वाटप थांबविणे गरजेचे आहे, अन्यथा हा पैसा मतदारांना आमिष दाखवण्यासाठी वापरला जाण्याची भीतीदेखील आ. पाटील यांनी व्यक्त केली.

आ. जयंत पाटील यांनी शुक्रवारी (दि. ३) पेणमध्ये प्रसार माध्यमांशी संवाद साधला. तेव्हा त्यांनी ही धक्कादायक बाब सर्वांच्या निदर्शनास आणली. ते म्हणाले, निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आलेला असताना •› पान २ वर

# ठाकरेंच्या नवगणेंवर हल्ला, अपघात अंधारेंच्या हेलिकॉप्टरला

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख अनिल नवगणे महाड येथील सभेवरुन माणगावकडे येत असताना, गुरुवारी रात्रीच्या सुमारास टेमपाले गावाजवळ त्यांच्या वाहनावर हल्ला झाला. शिवसेना शिंदे गटाचे समर्थक आ. भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले व त्यांच्या २५ ते ३० सहकाऱ्यांनी दगड-काठ्या



**विकास गोगावलेसह २५ ते ३० कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल**

व काचेच्या बाटल्यांनी हल्ला केला. याप्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात आरोपींवर •› पान २ वर

### नवगणेंवरील हल्ल्याचा निषेध

आतापर्यंत जिल्ह्यात शांततेत निवडणूक प्रचार सुरू होता. परंतु, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल नवगणे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्यानंतर त्याला गालबोट लागले आहे. रायगडच्या इतिहासातील पहिल्यांदाच गाडी फोडण्याचा प्रकार घडला आहे. नवगणे यांच्यावरील हल्ल्याचा निषेध व्यक्त करतो. •› पान २ वर

### हवाई उड्डाण विभागामार्फत होणार चौकशी

रायगड लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार



अनंत गीते यांच्या प्रचारार्थ गेल्या दोन दिवसांपासून शिवसेनच्या उपनेत्या सुषमा अंधारे रायगड जिल्ह्यात आहेत. शुक्रवारी मुरूड येथील सभेला हेलिकॉप्टरने जाणार होत्या. मात्र, त्यांना घेण्यासाठी महाड येथे आलेले हेलिकॉप्टर हेलिपॅडजवळ उतरताना अचानक खाली कोसळले. सुदैवाने पायलट बचावले. या घटनेबाबत निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्याशी विचारणा •› पान २ वर

# पर्यटन हंगाम जोरात

### चार महिन्यांत एक लाख माथेरानला भेट



**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान पर्यटनस्थळाला मागील चार महिन्यांत एक लाख ७७ हजार पर्यटकांनी पसंती दिल्याने माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या तिजोरीत सुमारे ९३ लाख रुपयांचा महसूल जमा झाला आहे.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानला पर्यटकांची चांगली पसंती मिळत असून, मागील चार महिन्यांत लाखाच्या वर पर्यटकांनी माथेरानला भेट दिली आहे. येथील आल्हाददायक हवा, निसर्गसौंदर्य, गर्द हिरवीगार वनराई, लाल मातीच्या रस्त्यावरून रुबाबदार घोड्यावर बसून केलेली रपेट यामुळे हे पर्यटनस्थळ पर्यटकांच्या पसंतीस उतरत आहे. या पर्यटनस्थळाची ख्याती सर्वदूर पसरलेली असल्याचे चित्र आजही येथे दिसत आहे.

> माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्यावतीने पर्यटकांसाठी विविध योजना राबविल्या गेल्या आहेत. पर्यटकांच्या सोयी सुविधांच्या दृष्टीने प्रशासन कार्यरत आहे. त्यामुळे आत्ता पर्यटकांचा ओढा या पर्यटनस्थळी दिवसेंदिवस वाढत आहे.
>
> – राहुल इंगळे, मुख्याधिकारी तथा प्रशासक, माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

मुंबई-पुण्यातील शाळा आणि महाविद्यालयांना उन्हाळ्याची सुट्टी लागल्यानंतर अनेक जण माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी पर्यटनासाठी जातात. येथील उन्हाळ्याच्या सुट्टीत माथेरान पर्यटकांच्या गर्दीने फुलून जाते. यावर्षी जानेवारी ते एप्रिल या काळात सुमारे एक लाख ७७ हजार पर्यटकांनी माथेरानला भेट दिली. येथील माथेरानची राणी अर्थात मिनी टॉय ट्रेनलाही पर्यटक मोठ्या प्रमाणावर पसंती देत असल्याचे चित्र आहे. तसेच माथेरान पर्यटनस्थळी ई-रिक्षा सेवादेखील सुरू करण्यात आली आहे. या ई-रिक्षा सेवेचा येथे ज्येष्ठ •› पान २ वर



## वे|ध|क

### 'आघाडी'च्या प्रचाराने प्रस्थापितांच्या उरात धडकी

**रसायनी :** विद्यमान खासदार दाखवा आणि हवे ते जिंका अशी परिस्थिती असलेल्या मायक्रो लोकालिटीमध्ये संजोग वाघेरे थेट भिडत झंझावाती प्रचार करत असल्यामुळे प्रस्थापितांच्या उरात धडकी भरली आहे. शुक्रवार, दि. ३ मे रोजी संजोग वाघेरे यांचा पनवेल विधानसभा मतदारसंघातील विद्यमान खासदारांकडून दुर्लक्षित झालेल्या क्षेत्रामध्ये प्रचार दौरा झाला. इंडिया आघाडीतील मित्र पक्षांची खंबीर साथ संजोग वाघेरे पाटील यांना लाभत असल्यामुळे पनवेल परिसरात पुन्हा एकदा संजोग वाघेरे यांचा दणदणीत आवाज घुमला. संजोग वाघेरे यांच्यासमोरील मशाल निशाणी असलेले बटण दाबून त्यांना प्रचंड मताने विजयी करा, अशा स्वरूपाचा प्रचार करण्यासाठी हा झंजावाती दौरा आयोजित करण्यात आला आहे.

### कामगार संघटनांचा संजोग वाघेरेंना पाठिंबा

**पनवेल :** मावळ लोकसभेचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना समाजाच्या सर्वच स्तरांतून भरघोस पाठिंबा मिळत आहे. पनवेल येथील विविध कर्मचारी संघटनांनी संजोग वाघेरे पाटील यांना जाहीर पाठिंबा देत अफाट शक्ती प्रदर्शन केले. स्वर्गीय कामगार नेते श्याम म्हात्रे यांनी असंघटित कामगारांना एकत्र करत विविध संघटनांची निर्मिती केली. त्यांच्या पश्चात त्यांची कन्या श्रुती म्हात्रे त्याच जोमाने या संघटना चालवत आहेत. कोकण श्रमिक संघ, व्यावसायिक विक्रेता संघ, गणेश मार्केट, बीएमटीसी कर्मचारी पुनर्वसन समिती, घरेलू कामगार संघटना, पनवेल हॉकर्स फेडरेशन, गणेश मंदिर ट्रस्ट, रिक्षा चालक संघटना, इमारत बांधकाम कामगार संघटना आदी संघटनांनी ३३ मावळ लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत आणि लोकप्रिय उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. पनवेल येथील खांदा वसाहत येथील आगरी शिक्षण संस्थेच्या सभागृहात शुक्रवारी (दि.३) रोजी हा मेळावा संपन्न झाला.


# विद्यमान खासदार शेतकरीविरोधी; मत मागण्याचा अधिकार आहे का?

## शेकापचे राजेश केणी यांची तोफ धडाडली

**। पनवेल । वार्ताहर ।**

शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळणाऱ्या विद्यमान खासदार महोदयांना मत मागण्याचा कुठलाही अधिकार नाही, असा खरमरीत इशारा देत शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी यांनी बारणे यांना ठणकावले आहे.

ते म्हणाले की, गेली दहा वर्षे अन्यायकारी नैना प्राधिकरण विरोधात पनवेल-उरणमधील शेतकरी लढा लढत आहेत. यामध्ये गाव जनजागृती बैठका ज्या आजपर्यंत किमान ३०० झाल्यात. २५ दिवस सुरू असलेले गाव बंद आंदोलन झाले, ५००० शेतकऱ्यांचा मंत्रालयावर पायी मोर्चा काढला गेला, ४००० वाहनांचा नैना प्राधिकरणाच्या कार्यालयावर मोर्चा गेला होता. बोरले येथे ३५ दिवस साखळी उपोषण चालले, महिलांचा लक्षणीय सहभाग असणारे पळस्पे येथील सलग नऊ दिवस झालेले उपोषण, तुरमाळे येथे नैना विरोधात केलेले ८ दिवस उपोषण, एवढा पराकोटीचा विरोध होत असतानादेखील खासदार महोदय येथे फिरकलेदेखील नाहीत. या आंदोलनाच्या वेळी कित्येक शेतकरी बांधवांवर नियमबाह्य पद्धतीने गुन्हे दाखल झालेत. ही आंदोलने शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी केलेली होती, यात कुठल्याही राजकीय पक्षाचा सहभाग नव्हता, मग खासदार महोदयांनी शेतकऱ्यांची विचारपूस करण्यासाठी येणे अपेक्षित होते. सातत्याने शेतकरी विरोधी भूमिका घेणाऱ्या या महाशयांना मते मागण्याचा कुठलाही अधिकार नाही.



जी कथा नैना प्रकल्पाच्या बाबतीत, तीच कथा विरार-अलिबाग कॉरिडोर रस्त्यासंदर्भातदेखील आहे. या प्रकल्पातील अन्यायकारक भूसंपादनाविरोधात शेतकऱ्यांनी कित्येक वेळा संघर्ष केला. शेतकऱ्यांना दिला जाणारा मोबदला कमी असल्याकारणाने आ. बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी संघर्ष केला. या ठिकाणीदेखील खासदार असणारे श्रीरंग बारणे कधीच आले नाही. मुंबई ऊर्जा प्रकल्पामध्येदेखील शेतकरी संघर्ष करताना खासदार असणारे श्रीरंग बारणे कधीच फिरकले नाहीत. येथे प्रकल्प साकारण्यासाठी पोलिसी बळाचा वापर केला गेला आहे. विरोध करू पाहणाऱ्या शेतकऱ्यांना उचलून अक्षरशः तुरुंगात डांबले आहे. राष्ट्रीय प्रकल्पाकरिता जमिनी घेत असाल तर त्या शेतकऱ्यांचे होणारे नुकसान लक्षात घेता त्या पद्धतीनं पुनर्वसन मूल्य दिले पाहिजे, याकरिता वास्तविक खासदारांनी दिल्ली दरबारी भांडणे आवश्यक होते. परंतु या शेतकऱ्यांनी पाठवलेल्या पत्रांवर खासदार महोदयांनी दखल घेण्याचीदेखील कष्ट घेतले नाहीत. उद्धव ठाकरे साहेबांनी ज्या पक्षाच्या माध्यमातून यांना दोन वेळा खासदार केलं त्या पक्ष नेतृत्वाचे जे होऊ शकले नाहीत ते जनतेचे काय होणार? म्हणूनच आता हवा नवा खासदार या भूमिकेतून शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून लढणारे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांची मशाल हाती घ्यायची आहे. माझी शेतकरी बांधवांना विनंती आहे की, ही लढाई तुमच्या-आमच्या अस्तित्वाची असेल. आपल्या जमिनी घेऊन आपल्याला देशोधडीला लावणाऱ्यांना धडा शिकवायचा असेल, तर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्यासमोरील मशाल चिन्हाचे बटण दाबून त्यांना भरघोस मतांनी विजयी करा.

# करंजाडेमधून संजोग वाघेरेंना आघाडी मिळवून देणार

## शेकापचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांचा ठाम विश्वास

**। पनवेल । वार्ताहर ।**

करंजाडे नोडमधून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना भरघोस आघाडी मिळवून देणार, असा ठाम विश्वास शेतकरी कामगार पक्षाचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी व्यक्त केला आहे. ते पुढे म्हणाले की, दोन वेळा खासदारकी उपभोगणाऱ्या बारणे यांच्याविरोधात जनमत तयार झालेले आहे. राज्यात आणि देशातदेखील हीच परिस्थिती आहे. केंद्रीय यंत्रणांचा वापर करून विरोधक संपवण्याच्या हुकूमशाही पद्धतीला जनता अक्षरशः वैतागली



आहे. त्यामुळे नवा आणि जनतेशी नाळ जुळलेला खासदार या वेळेला जनता निवडून देणार आहे.

करंजाडे नोड हा पनवेल शहराच्या अगदी कुशीला असला तरीदेखील तांत्रिकदृष्ट्या तो उरण विधानसभा मतदारसंघांमध्ये येतो. मूळ गाव, आदिवासी पाडे आणि सिडकोने वसविलेली वसाहत असे संमिश्र रहाणीमान या नोडमध्ये आढळून येते. होऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळापासून सगळ्यात जवळची नागरी वस्ती म्हणून या नोडला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. करंजाडेमध्ये शेतकरी कामगार पक्षाचे प्राबल्य अगदी सुरुवातीपासून राहिलेले आहे. महाविकास आघाडी मित्र पक्षांची साथ प्राप्त होणार असल्यामुळे या ठिकाणी संजोग वाघेरे पाटील यांचे पारडे जड समजले जाते.

आमच्या विरोधकांनी ग्रामपंचायत निवडणुकीत जरी विजयाचे गणित जुळवून आणले असले तरी देखील विकास कामे करण्याचे कसब त्यांच्या अंगी नाही. केवळ सत्ता उपभोगायची आणि विरोधकांना संपवायचे यापलीकडे यांना दुसरे काहीही येत नाही. दिल्लीमधील सत्ताधिकारी, राज्यामधील सत्ताधिकारी आणि ग्रामपंचायतीतील सत्ताधिकरी यांच्या विरोधात जनता प्रचंड वैतागलेली आहे. येणाऱ्या निवडणुकीमध्ये जनतेचा रोष मतपेटीमधून नक्कीच उमटेल.

# संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ

**। रसायनी । वार्ताहर ।**

मावळ लोकसभा इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचा वासांबे जिल्हा परिषद विभागातील प्रचाराचा नारळ दांडफाटा येथील नवसाला पावणाऱ्या आई टाकेदेवीला फोडून प्रचाराला सुरुवात करण्यात आली. यावेळी इंडिया आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी घोषणाबाजी करत मशाल चिन्हाला निवडून आणण्याचा चंग बांधला. त्यानंतर वासांबे मोहोपाडा विभागातील कार्यकर्त्यांनी तळेगाववाडी, कातकरीवाडी, तळेगाव, पानशिळ, खोंडा, मोहोपाडा कातकरीवाडी येथे



प्रचार घराघरात मशाल चिन्हाचा प्रचार केला.

यावेळी इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांचा प्रचारातील उत्साह पाहून संजोग वाघेरे पाटील यांचा विजय निश्चित असल्याचे मतदार राजाकडून बोलताना दिसून आले. प्रचारप्रसंगी कार्यकर्त्यात मोठा उत्साह दिसून आला. यावेळी इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून उमेदवार व मशाल निशाणी व्यवस्थित समजावून सांगण्यात आली.

दरम्यान, वासांबे जिल्हा परिषद विभागातील इंडिया आघाडीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते संजोग वाघेरे यांच्या प्रचारासाठी सज्ज झाले असल्याचे चित्र आहे.

# दिव्यांगांनी १०० टक्के मतदान करावे : पवार

**। म्हसळा । वार्ताहर ।**

आगामी लोकसभा निवडणुकीत ८५+, दिव्यांग आणि सर्वांनी १०० टक्के मतदान प्रक्रियेत सहभाग हाच लोकशाहीचा पाया असल्याचे मत म्हसळा येथे संपन्न झालेल्या दिव्यांग मतदार जनजागृती कार्यक्रमात बोलताना रायगड लोकसभा मतदारसंघाचे आयकॉन साईनाथ पवार यांनी म्हसळा येथे बोलताना व्यक्त केले.

तुमचे मत लोकशाही भक्कम करण्यासाठी निश्चितपणे हातभार लावेल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. त्यांनी पुढे सांगितले प्रथमच भारत निवडणूक आयोगाने दिव्यांग मतदार आणि ८५+ ज्येष्ठ



नागरिक यांच्यासाठी घरीच मतदान करण्यासाठी विशेष मोहीम राबविली असून निवडणूक आयोगाला सहकार्य करण्याचे आवाहन पवार यांनी केले. मतदान केंद्रावर व्हील चेअर, ब्रेन लिपीची सोय असलेले मतदान यंत्र, विशेष स्वयंसेवक, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्ती यांना वेगळी रांग, त्यांच्यासाठी वाहन सुविधा आणि सांकेतिक भाषा अशा सुविधा देणार असल्याचे तहसीलदार समीर घारे यांनी सांगितले.

याप्रसंगी तहसीलदार समीर घारे, विठ्ठल राठोड, जाधव, शिवाजी पाटिल, छाया म्हात्रे, भावना भारुडे, विजय लाड, दयानंद महामूनकर, अब्दुल कवी, किशोर मोहिते, अरुण माळी आदी मान्यवर उपस्थित होते.

# अनंत गीतेंना प्रचंड मतांनी विजयी करा

## राजाभाऊ ठाकूर यांचे आवाहन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मशाल निशाणीसमोरील बटण दाबून आपले इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन रायगड लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस आय पक्षाचे समन्वयक तथा प्रमुख मार्गदर्शक राजाभाऊ ठाकूर यांनी माणगाव येथे काँग्रेस आय पक्ष आयोजित लोकसभा निवडणूक मार्गदर्शन शिबिरात कार्यकर्त्यांना केले.

रायगड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक येत्या ७ मे रोजी होत असून, या निवडणुकीसंदर्भात श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ काँग्रेस आय



पक्ष आयोजित मार्गदर्शनपर शिबीर शुक्रवार, दि.३ मे रोजी कुणबी भवन हॉल, माणगाव या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या मेळाव्यास राजाभाऊ ठाकूर यांनी उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. या मेळाव्याला डॉ. नरेंद्र सिंह, निजाम कागदी, आशफाक पानसरे, डॉ. दानिश लांबे, विजय तोडणकर, विलास सुर्वे, शरद भोसले, डॉ. मुईज शेख, सादिक राऊत, सुनील देशमुख, समीर परदेशी, निसार फिरफिरे, फैसल अधिकारी, बिलाल कुरेशी, नरेंद्र जाधव, वैभव पाटील आदी मान्यवरांसह काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना राजाभाऊ ठाकूर पुढे म्हणाले की, आज आपल्याला देशासाठी काम करण्याची वेळ आली आहे. मोदी सरकारने गोरगरीब, सर्वसामान्य जनतेचा विचार केला नाही तर धनदांडग्यांचा विचार केला. या मोदी सरकारला सत्तेतून बाजूला ठेवायचे आहे. इंडिया आघाडीत २८ पक्ष सहभागी झाले असून, सर्वत्र आघाडीला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे.

पान १ वरुन

## ...ताकद तुमच्या हातात

पाडण्याची ताकद तुमच्या हातात आहे, असा विश्वास शिवसेनेचे युवा नेते आदित्य ठाकरे यांनी जनतेला दिला.

इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ मुरूडमध्ये शुक्रवारी (दि.३) प्रचार सभा आयोजित करण्यात आली. यावेळी ठाकरे बोलत होते. यावेळी काँग्रेसचे नेते भाई जगताप, शेकापचे माजी आ. पंडित पाटील, आ. संजय पोतनीस, उमेदवार अनंत गीते, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, शेकाप महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील, मराठी मुस्लीम समाजाचे अध्यक्ष सुभान अली, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, विजय गिदी, नीता गिदी, वामन चुनेकर, तुकाराम पाटील, चंद्रकांत कमाने, प्रशांत मिसाळ, हेमंत पाटील, शंकर गुरव, दर्शना पाटील, नाना गुरव, पिंट्या ठाकूर, अस्लम हलदे, नवशाद शाबान, नवशाद दळवी, शरद चवरकर, प्रमोद भायदे, आदेश दांडेकर, अल्पा घुमकर, किशोर जैन, सुभाष महाडिक आदी मान्यवरांसह शेकापसह इंडिया आघाडीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी मतदारांसह कार्यकर्त्यांना संबोधित करताना आदित्य ठाकरे म्हणाले की, देशात असुरक्षिततेचे वातावरण आहे. महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे, युवकांना रोजगार नाहीत, शेतीमालाला हमीभाव नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील अनेक उद्योग गुजरातला जात आहेत. तरुणांच्या घशातला घास काढण्याचा घाट या भाजपने सुरु केला आहे. त्याची सुरुवात झाली आहे. दहा वर्षांत गॅस, डिझेल व पेट्रोलच्या भावामध्ये तिप्पट वाढ केली आहे. सर्वसामान्यांचे जगणे मुश्कील केले आहे. आरक्षण अधिकार, संपवण्याचा प्रयत्न सुरु आहे.

प्रत्येक गोष्ट गुजरातला घेऊन जात आहेत. जर का यांचे सरकार आले, तर मुंबईतील मंत्रालयदेखील गुजरातला घेऊन जातील. त्यामुळे प्रत्येकाने सावध भूमिका घेत लोकशाहीच्या हितासाठी इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना मतदान करून निवडून द्या, असे आवाहनही आदित्य ठाकरे यांनी केले. आपल्या देशाचे संविधान वाचवण्यासाठी मोठ्या प्रमाणात मतदान करून भाजप राजवट नाहीशी करूया, असा निश्चय यावेळी त्यांनी व्यक्त केला. एक ठाकरे सोबतीला घेऊनसुद्धा भाजपला देशाची सत्ता घेता येणार नाही. कारण, जनतेच्या मनात तीव्र असंतोष आहे. आता त्यांना जागा दाखवल्याशिवाय जनता स्वस्थ बसणार नाही. शेतकऱ्यांची आंदोलने चिरडली जातात. नोटबंदी करून अनेकांना देशोधडीला लावले. त्यामुळे सत्तेत आल्यावर पुन्हा भाजप नोटबंदी आणणार आहे. यासाठी जनतेने सावध राहावे, असा इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला.

### ही लढाई अस्तित्वाची : गीते

चिन्हावर मतदान करून महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्या, असे आवाहन इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांनी केले.

### अब की बार भाजप तडिपार : जगताप

कारण, या निवडणुकीत भाजपसारखा राक्षस डोक्यावर बसला, तर राज्यघटना पायदळी तुडवण्याची भीती आहे. त्यामुळे 'अब की बार, भाजप तडिपार' ही भूमिका घेत अनंत गीते यांना बहुमांनी निवडून द्या, असे आवाहन काँग्रेसचे नेते भाई जगताप यांनी केले.

### हा आचारसंहितेचा भंग नाही का?

अचानक अलिबाग-विरार बहुउद्देशीय प्रकल्पाच्या जमीन मालकांना पैशाचा वाटप करणे हे चुकीचे आहे. कारण, वाटप केलेला पैसा हा जमीन मालकांचा नसून, या प्रकल्पातील जमिनी गुंतवणूकदाराने घेतलेल्या असल्याने हा पैसा या गुंतवणूकदारांकडे जाणार आहे आणि हाच पैसा शेवटच्या दोन दिवसात मतदारांना वाटण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या काळात अशाप्रकारे जमिनीचा मोबदला वाटप करणे म्हणजेच अचारसंहितेचा भंग करणे होय.

पुढे भाईंनी सांगितले की, दोन्ही जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता हा पैशांचे वाटप करणे म्हणजे एकप्रकारे हे मोठे षड्यंत्र आहे. मात्र, याकडे निवडणूक आयोग कानाडोळा का करत आहे, हे न समजणारे कोडे आहे. जवळपास २०० कोटी रुपये जमिनीच्या मोबदल्याचे देण्याची हालचाल सुरु असल्याने निवडणूक आयोगाने तातडीने जमिनीच्या मोबदल्याच्या पैशाचे वाटप थांबविणे गरजेचे आहे, अन्यथा हा पैसा मतदारांना आमिष दाखविण्यासाठी वापरला जाईल, अशी भीती प्रसार माध्यमांशी बोलताना आ. जयंत पाटील यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांच्यासमवेत शेकाप युवा नेते अतुल म्हात्रे, जिल्हा परिषद मा. सभापती महादेव दिवेकर, महिला आघाडी प्रमुख स्मिता पाटील, प्रल्हाद पाटील आदी उपस्थित होते.

### 'प्रत्येक शेतकरी करोडपती होणार'

सार्वजनिक विद्या मंदिर येथे पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक शुक्रवारी (दि. ३) आयोजित केली होती. यावेळी आ. पाटील बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पी.डी. पाटील, शेकाप चिटणीस तथा मा. सभापती महादेव दिवेकर, मा. नगराध्यक्ष गुरुनाथ मांजरेकर, प्रकाश शिंगरुत, अशोक देसाई, प्रल्हाद पाटील, स्मिता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, आ. पाटील यांनी याविषयी सविस्तर मार्गदर्शन शेकापचे युवा नेते तथा मास्टर ऑफ आर्किटेक्ट अतुल म्हात्रे हे करतील, असे समस्त कार्यकर्त्यांना सांगितले. त्यानुसार अतुल म्हात्रे यांनी सांगितले की, भूमीपुत्र हा विकासाचा केंद्रबिंदू होणार नाही तर तो विकासाचा भागीदार होईल. कारण मुंबई, नवी मुंबई येथून भूमीपुत्र शेतकरी विकासाच्या प्रक्रियेतून बाहेर फेकला गेला आहे. त्यामुळे भविष्यात होणाऱ्या तिसऱ्या मुंबईसाठी खऱ्या अर्थाने शासनाची पावले पुढे पडायला सुरुवात झाली आहे. पनवेल, पेण, खालापूर या विभागात एमएमआरडीए आपले जाळे पसरु लागले आहेत. या बाबीकडे वेळीच लक्ष दिले नाही तर मुंबई आणि नवी मुंबई येथील भूमीपुत्रांसारखी अवस्था आपल्या रायगडच्या भूमीपुत्रांची होईल. मला अभिमान आहे की, आम्ही रायगडवासियांनी तब्बल १८,५०० एमएमआरडीए विरुध्द हरकती नोंदविल्या आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, अटल सेतूमुळे रायगड जिल्हा मुंबईच्या अतिशय जवळ आला आहे. त्यामुळे अनेक गूंतवणुकदारांचे लक्ष रायगडातील जमिनींकडे लागलेले आहे. पूर्वी उरण, पेणमध्ये सेझसाठी भूसंपादन होत होते. परंतु, येथील स्थानिक नेतृत्वाने भूसंपादनाला विरोध करून सेझ प्रकल्प रद्द केला. परंतु, आत्ता एमएमआरडीएच्या माध्यमातून पुन्हा एकदा गूंतवणूकदारांसाठी जमिनी संपादन करण्याचा शासनाचा डाव आहे. परंतु, या पुढे शासनाच्या प्रकल्पाला शेतकरी जमिनी देणार नाहीत तर त्या प्रकल्पात शेतकरी भागिदार होतील.

### पर्यटन हंगाम जोरात

नागरिकांना मोठा फायदा होताना दिसत आहे. मिनीट्रेन आणि ई-रिक्षामुळे येणाऱ्या पर्यटकांचा प्रवास येथे सोयीस्कर होत आहे. दरम्यान, मे महिन्यात पर्यटक संख्येत अजून वाढ होईल, असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात येते आहे. माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेकडून मुख्य प्रवेशद्वारी हिरकणी कक्ष तसेच मोफत वायफाय सुविधा दिली जात आहे. महसूल प्राप्ती : जानेवारी ३४,७६,४७५, , फेब्रुवारी २३,०२,०००, मार्च १६,४३,९५०, एप्रिल १८,८४,७२५, एकूण : ९३,०७,१५०

### ठाकरेंच्या नवगणेंवर हल्ला, अपघात अंधारेंच्या हेलिकॉप्टरला

गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, शुक्रवारी सुषमा अंधारेंच्या हेलिकॉप्टरला अपघात झाला, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

दरम्यान, अनिल नवगणे यांच्यावरील भ्याड हल्ल्यात त्यांचे चालक किरकोळ जखमी झाले, तर अनिल नवगणे हे सुदैवाने या हल्ल्यात बचावले. अनिल नवगणे यांच्यावर विर रेल्वे स्टेशन ते टेमपालेदरम्यान येत असताना गाडीवर हल्ला केला असून, यावेळी अनिल नवगणे आपल्या सहकाऱ्यांसह महाड येथून प्रचार सभा करून माणगावकडे येत असताना हा भ्याड हल्ला झाला. यावेळी त्यांची इनोवा गाडी क्र. एमएच ०६ बीएम ७३७४ या गाडीसमोर फॉर्च्युनर गाडी उभी केली होती. तसेच यावेळी आ. भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले व त्यांचे सहकारी असे एकूण २५ ते ३० जणांनी काचेच्या बाटल्या दगडी लाठी असा आमच्यावर प्राणघातक हल्ला केल्याचे नवगणे यांनी सांगितले आहे.

याप्रकरणी अनिल नवगणे यांनी गोरेगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, पोलिसांनी विकास गोगावले, सिध्देश पाटेकर, सिध्देश मोरे, शुभम पालांडे, जितेंद्र सावंत, विजय पवार, निखिल शिंदे, सुयोग पाटील यांच्यासह इतर अनोळखी इसम सर्व रा. महाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सहा. पोलीस निरीक्षक विजय सुर्वे हे करीत आहेत.

### हवाई उड्डाण विभागामार्फत होणार चौकशी

**केली असता ते म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आलेल्या अहवालानुसार परवानगी प्रशासनाकडून देण्यात आली. हेलिकॉप्टर उतरण्यापूर्वी गोल राऊंड मारला जातो. जेणेकरून हेलिकॉप्टर उतरण्यास योग्य आहे की नाही, याची खात्री पायलटद्वारे केली जाते. परंतु, पायलटला उतरताना अंदाज आला नसावा, त्यामुळे ही घटना घडल्याची शक्यता वर्तविली जात आहे. मात्र, या घटनेची चौकशी नागरी विमान महानिदेशालय विभागाकडून केली जाणार आहे. त्यानंतरच नक्की काय झाले याची माहिती उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

### नवगणेंवरील हल्ल्याचा निषेध

**या घटनेनंतर नवीन संस्कृती निर्माण होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. हल्लेखोरांविरोधात कठोर कारवाई करणे अपेक्षित आहे. यातील सूत्रधार कोण, हे शोधून काढणे आवश्यक आहे. तसेच सुषमा अंधारे यांना घेण्यासाठी आलेले हेलिकॉप्टर कोसळल्याची दुर्घटना घडली. एकाच दिवशी दोन घटना घडल्या, ही दुर्दैवाची गोष्ट आहे, असे माजी आ. पंडित पाटील यांनी सांगितले.**

**अनिल नवगणे यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाच जणांना ताब्यात घेतले आहे. त्यामुळे पुढील तपास सुरु आहे. हल्लेखोरांविरोधात कारवाईची मोहीम सुरु आहे.**

**- अतुल झेंडे, अपर पोलीस अधीक्षक, रायगड**

### पेणकरांनी केली दरेकरांची बोलती बंद

प्रश्नांच्या भडिमारामुळे त्यांची बोलती बंद झाली.

प्रवीण दरेकर यांनी पत्रकारांशी बोलताना पेण विधानसभा मतदारसंघात कमीत कमी ७५ हजारांची आघाडी घेणार असल्याचे सांगितले. तसेच भाजपच्या स्टाईलमध्ये मोदींविषयी गुणगौरव केला. मात्र, ज्यावेळेला पत्रकरांनी त्यांना प्रश्न विचारायची सुरुवात केली, त्यावेळी थातुरमातुर उत्तरं देऊन पत्रकारांना गप्प करण्याचा प्रयत्न केला. परंतु, पेणच्या पत्रकारांनी बाळगंगा धरण, पेण अर्बन बँक, खारेपाटातील पाणीप्रश्न, तटकरेंनी पेण तालुक्यात निधीचा उपयोग न करणे, जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांची उमेदवारी डावलणे यांसह पेण तालुक्यातील अनेक प्रश्नांचा भडिमार केला. त्यावेळी फक्त दरेकर एवढेच म्हणत होते, तटकरे पूर्वी महाविकास आघाडीत होते, आता ते महायुतीमध्ये आलेत. कालपर्यंत तटकरे भ्रष्टाचारी म्हणून म्हणणारे प्रवीण दरेकर आज तटकरेंना मुलायम भाजपाची शाल पांघरु पाहात होते. मात्र, त्यांचा हा मनसुबा पेणच्या पत्रकारांनी उधळूनच लावला. शेवटी दरेकरांच्या बचावासाठी आमदार रवीशेठ पाटील यांना हस्तक्षेप करुन पत्रकारांना योग्य ती उत्तरे द्यावी लागली.

# रसायनीत पोलिसांचे संचलन



**। रसायनी । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रसायनी पोलीस ठाण्याच्यावतीने वरिष्ठांच्या आदेशान्वये रसायनी परिसरात विविध भागात रुट मार्च करण्यात आला.

रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली एसआरपीएफचे जवान व रसायनी पोलिसांचा ताफा रुट मार्चमध्ये सामील झाला होता. यावेळी पोलिसांची शिस्तबद्ध परेड मोहोपाडा अचानक मैदानावरुन मोहोपाडा मार्केट, मोहोपाडा गाव, नवीन पोसरी व वावेघर असा रुट मार्च काढण्यात आला.

# गद्दारांना जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही : सचिन आहिर



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

शिवसैनिक हा आजही पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्यासोबत असून मशाल घेउन गद्दारांना जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा शिवसेना उपनेते सचिन आहीर यांनी दिला.

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कर्जत खालापूर विधानसभा मतदार संघात पदाधिकारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. शिवसेना उपनेते सचिन आहीर यांच्या अध्यक्षतेखाली लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूशीवर पार पडली. यावेळी उपनेते सचिन आहीर यांनी उपस्थितांना संबोधित करताना शिंदे गटाकडून अनेक शिवसैनिकांना निधीचे आमिष दाखवूनही निष्ठावंत शिवसैनिक उद्धव ठाकरे यांच्या सोबत राहीला आहे. याचा सार्थ अभिमान असून महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी एक दिलाने काम करा, असे आवाहन अहिर यांनी केले आहे. पुढे बोलताना अहिर म्हणाले की, जे टेबलावर नाचले होते त्यांना टेबलाखाली उतरवण्याचे काम करा. पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांना सर्व देऊनही ते गद्दार झाले म्हणुन त्यांना या निवडणुकीत जागा दाखवून द्या.

याप्रसंगी सचिन अहिर, केसरीनाथ पाटील, नितीन सावंत, सुवर्णाताई जोशी, एकनाथ पिंगळे, उत्तम कोळंबे, राजाराम शेळके, करुना बडेकर, प्रशांत खांडेकर, महेश पाटील आदी प्रमुखांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.





● महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ मुरूडमध्ये सभा आयोजित करण्यात आली. यावेळी कॉंग्रेसचे नेते भाई जगताप, शेकापचे माजी आ. पंडित पाटील, उबाठा गटाचे आ. संजय पोतनीस, उमेदवार अनंत गीते, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, मराठी मुस्लीम समाजाचे अध्यक्ष सुभान अली, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, विजय गिदी आदी मान्यवर उपस्थित होते. (छायाचित्रे : सुधीर नाझरे)









# गोगावलेच तटकरेंची ठासणार

## पोलादपुरमध्ये शिवसेनेच्या फायरब्रॅण्ड नेत्या सुषमा अंधारेंचा गौप्यस्फोट

## शेख सुभानअली यांनीही भाषणातून धमन्यांतले रक्त सळसळवले



**शैलेश पालकर**
**। पोलादपूर ।**

सुनील तटकरेंनी लेकीसाठी गोगावलेभाऊंचे मंत्रिपदाचे ताट हिरावून घेतले. त्यामुळे तटकरेंचा गेम करण्यासाठी गोगावलेभाऊंनी फिल्डींग लावलीच असेल...! उघड लावायची अडचण असेल तर गुप्तपणे फिल्डींग लावली असेल. भरत गोगावले यांनी वरवर कितीही तटकरेंच्या प्रचाराचे नाटक केले तरी आतून तटकरे यांची ठासण्याची तयारी चालवली असणार हे नक्की आहे, अशा शेलक्या शब्दांमध्ये शिवसेनेच्या फायरब्रॅण्ड नेत्या सुषमा अंधारे यांनी गौप्यस्फोट केला. तसेच, पोलादपूर येथे गुरुवारी (दि.२) इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीतेंच्या प्रचारसभेत विरोधकांवर चांगल्याच कडाडल्या. गद्दारांना रायगडच्या पवित्र भुमितच गाडण्याचे काम करण्यासाठी मतदार मावळे सज्ज असल्याचे मत व्यक्त करणाऱ्या शेख सुभानअली यांनीही मतदार जनतेच्या धमन्यांतले रक्त सळसळवले.

पोलादपूर येथील छत्रपती शिवाजीनगर येथील जनसेवा प्रतिष्ठानच्या शाळेसमोरील मैदानात इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप-कामत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष कृष्णा करंजे, सुहास मोरे, शेकापक्षाचे विधानसभा अध्यक्ष एकनाथ गायकवाड, जगन्नाथ वाडकर, शिवसेनेचे जिल्हा प्रवक्ते धनंजय देशमुख, पद्माकर मोरे, अमित मोरे, चेतन पोटफोडे, सुशांत शेलार, ॲड.स्वीटी गिरासे, शैलेश सलागरे, पोलादपूर नगरपंचायतीचे विरोधीगटप्रमुख नगरसेवक दिलीप भागवत, कृष्णा कदम, तालुकाप्रमुख अनिल मालुसरे, ॲड.पालकर, जाधव सर तसेच शेकाप, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट व इंडिया आघाडीतील हजारो कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी सुषमा अंधारे यांनी त्यांच्या धडाकेबाज भाषणातून सत्ताधाऱ्यांवर सडेतोड टीका केली. यावेळी त्या म्हणाल्या की, दुकानामध्ये पाटी लावलेली असते, एकदा विकलेला माल परत घेणार नाही तर विकलेल्या खासदार, आमदार यांना आपण परत का संधी द्यावी? गद्दारीला माफी नाही. या विकल्या गेलेल्या गद्दारांनादेखील जनता माफ करणार नाही, असे भाष्य करताना त्यांनी पुढे सांगितले, लोकांच्या मनात राग आहे. भाजपा सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता तयार करतेय; पण जनतेसाठी या पैशाचा वापर करत नाही.

हा पैसा अंगणवाडी सेविकांना पगारासाठी, मुंबई-गोवा महामार्गासठी नाही तर आमदार खासदार यांच्या घोडेबाजारासाठी केला जातोय. यासाठी भाजपाला गाडायचं आहे. सुषमा अंधारे यांनी त्यांच्या भाषणात, सुनील तटकरे यांनी किती लोकांना फसवलं? २०२४ मध्ये भाजपा सत्तेत आलं तर संविधान बदलण्यासाठीच येणार आहे. वन नेशन वन इलेक्शन हे फक्त हुकुमशहाला निवडण्यासाठी असून केंद्र सरकारने सेवानिवृत्तांना पेन्शन नाही दिली, खासगी विद्यापीठ विधेयक आणले आहे. यामध्ये शैक्षणिक आरक्षण नाही, नोकरी देणे काढून टाकणे, हे कोण करतंय असं विचारून, लोकांच्या लग्नात बुंदी वाढणाऱ्या चाळीस लोकांना खाती कशी चालवायची माहिती नाही, असा टोला लगावला.

### गोगावले, नारायणभाऊंची बिघडलेली लेकरं

**तटकरेंबद्दल मी बोलू शकते. त्यांच्या कन्या म्हणाल्या, एकत्र या, चार जूनला गुलाल खेळू. मी गीते काकांचा गुलाल घेऊन येते. यापुढे रायगडातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात रोटी, बोटी, थप्पी, बिर्याणीचे राजकारण चालणार नाही. गोगावलेभाऊंचा मुलगा अन् नारायणभाऊंची दोन पोरं ही संस्कार न झाल्याने बिघडलेल्या लेकरांची त्यांची भाषा आहे, असेही अंधारे म्हणाल्या.**

### येड्याची जत्रा अन् कारभारी सतरा

**ड्रग्जवर केतन तिरोडकर सांगताहेत पण फडणवीस दूर्लक्ष करीत आहेत. एक्साईज खात्याचा मंत्री देसाई सत्तारभाईकडे चुना मागतोय. यांच्या हाती आलेल्या सत्तेनंतर येड्याची जत्रा आणि कारभारी सतरा झालेत. उध्दव ठाकरे यांनी कोविड काळात जगात सर्वोत्तम काम केले, मात्र त्यांना अडचणीत आणण्याचे काम या गद्दारांच्या सत्तेकडून सुरू आहे. पुन्हा पंतप्रधान बनवायचे आहे, कशासाठी? १५ लाख जनतेच्या खात्यात जमा करायचे आहेत? तरूणांना नोकऱ्या देण्याचे काम अपूर्ण राहिले आहे, ते पुर्ण करायचे आहे का? मोदींची डिग्री फर्जी आहे, म्हणून तरूणांना चांगले मोफत शिक्षण देण्याची इच्छा मोदींमध्ये निर्माण झाली आहे का? अशा विविध प्रश्नांची सरबराई अंधारे यांनी केली.**

मोदी आणि भाजप नेत्यांच्या भाषणांतून देशाची राज्यघटना बदलण्याचे प्रयत्न २०२४ च्या निवडणुकीमध्ये त्यांना अपेक्षित बहुमत मिळाल्यास ते करतील, अशी उघड चर्चा घडवली जात असताना त्यांचे प्रयत्न उलथवून टाकण्यासाठी उध्दव ठाकरे यांच्यासह इंडिया आघाडीच्या निकाराच्या प्रयत्नांना जनतेने साथ देण्याची गरज आहे. रायगड ३२ लोकसभा मतदार संघाचे इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना येत्या ७ मे रोजी मशालीचे पहिले बटन दाबून विजयी करा.

–स्नेहल जगताप कामत
माजी नगराध्यक्ष, महाड

### दगाबाजी करणाऱ्यांचा कडेलोट करणार

**शिवाजी महाराजांच्या धोरणाप्रमाणे लाख मेले तरी चालतील, पण लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे, असे होते. मात्र, सध्याची भाजपची निती म्हणजे शेतकरी मेले तरी चालतील, अदानी, अंबानी जगले पाहिजेत, अशी आहे. उध्दव ठाकरे आणि शरद पवार यांच्याशी गद्दारी करणाऱ्या नेत्यांना येसाजी कंकप्रमाणे नकार देता आला असता पण तसे ते वागले नसल्याने आता त्यांचा कडेलोट करण्याची वेळ आली आहे. दगाबाजी, गद्दारी करणाऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यात गर्दन मारण्याची शिक्षा होती. लोकशाहीतील गद्दारांसाठी मतदानातून शिक्षा द्यायची शपथ प्रत्येक मावळ्यांनी घेतली पाहिजे, असे शेख सुभानअलि यांनी आवाहन केले.**









● येत्या ७ मे रोजी तिसऱ्या टप्प्यातील मतदारसंघाचे मतदान होणार आहे. रायगड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक अवघ्या तीन दिवसांवर आली असून इंडिया आघाडीचे कार्यकर्ते जोमाने काम करीत आहेत. अलिबाग तालुक्यातील परहूर, खंडाळे, सुडकोळी, मुळे आदी ठिकाणी इंडिया आघाडीच्यावतीने घरोघरी पत्रके वाटण्यात आली.

॥ तृतीय पुण्यस्मरण ॥



स्व. प्रमोद पाटील (पिंट्याशेठ)
मृत्यू दि. ४ मे २०२१

कृषीवल परिवार

# टक्का, धक्का आणि धोका

मतदानाच्या दोन फेऱ्या झाल्या आहेत. तिसरी सात तारखेला होईल. पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये मतदान कमी झाले. म्हणजे मतदानाकडे पाठ फिरवून लोकांनी मोदी सरकारवर नाराजी दाखवलीच. शिवाय, बहुसंख्य ठिकाणी भाजपविरोधी लाट जाणवल्याचे सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि पत्रकारांनी मान्य केले. पण तीस एप्रिल रोजी वेगळेच काही घडले. त्या दिवशी निवडणूक आयोगाने मतदानाची अंतिम आकडेवारी जाहीर केली. पहिले मतदान झाले १९ एप्रिलला तर दुसरे २६ एप्रिलला. म्हणजे पहिल्याची अंतिम आकडेवारी तब्बल अकरा दिवसांनी आणि दुसऱ्याची चार दिवसांनी जाहीर होत होती.या घोषणेनुसार पहिल्या दिवशीच्या तात्पुरत्या आकडेवारीपेक्षाअंतिमांमध्ये सुमारे तीन ते पाच टक्क्यांपर्यंतची वाढ झालेली दिसली. विरोधकांनी त्यावर टीका केली. निवडणूक आयोगाचा एकूणच व्यवहार आतापर्यंत संशयास्पद राहिलेला आहे. त्यामुळे हा टक्का वाढण्यात देखील काही काळेबेरे वा लबाडी नाही ना अशी शंका आली तर ते स्वाभाविक मानायला हवे. त्यातच ज्या दिवशी मतांची ही अंतिम आणि वाढीवटक्केवारी जाहीर झाली त्याच दिवसापासून अमित शाह पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये भाजपला शंभर जागा मिळाल्या आहेत असे सांगू लागले. त्यापूर्वी शाह किंवा मोदी एकूण मतदान कमी झाल्याबद्दल नाराजी व्यक्त करीत होते. शिवाय, घटना बदलण्याच्या प्रचारामुळे वातावरण आपल्याविरुध्द जात आहे अशा शंकेने ते जोरजोरात घटनेचे आम्हीच रक्षण करू म्हणून सांगत होते. निवडणूक आयोगाची आकडेवारी आल्यानंतर मात्र त्यांनी जणू सुटकेचा निश्वास टाकला आणि पुन्हा चारसौपारचे नारे सुरू झाले. हा सर्वच घटनाक्रम संशय वाढवणारा आहे. निवडणूक आयोगाने याबाबत स्पष्ट खुलासा केलेला नाही. काँग्रेसची तुलना मुस्लिम लीगशी करणाऱ्या किंवा तुमचे मंगळसूत्र देखील काँग्रेस काढून घेई अशी खोटी भीती दाखवणाऱ्या पंतप्रधान मोदींवर निवडणूकआयोगाने खरे तर तात्काळ कारवाईकरायला हवी होती. पण तो गुढग्यात मान घालून बसला. त्यामुळे आता निःपक्षपणाबाबत सर्वांनाच शंका आहे. या टक्केवारीच्या निमित्ताने ती आणखी दाट झाली आहे.

## जबाबदारी आयोगाचीच

साधारणपणे मतदान झाल्या झाल्या पहिल्या दिवशी तात्पुरती आकडेवारी जारी केली जाते. नंतर मतदारसंघांतील सर्व पेट्या एकत्र करून सुमारे चोवीस तासांच्या आत अंतिम आकडेवारी जाहीर केली जाते. यावेळी मात्र यासाठी तब्बल अकरा दिवस घेतले गेले. आता खरे तर या सर्व प्रक्रियेत संगणकाचा वापर होतो. त्यामुळे कोणत्याही मतदानकेंद्रावरच्या सर्व टेबलांवरची बेरीज करण्यास एखाद तासही पुरायला हवा. पुढे सर्व केंद्रावरचा तपशील गोळा करून त्यांची बेरीज व टक्केवारी काढायला जास्तीत जास्त आठ तास पुरे आहेत. काही मतदानकेंद्रे दुर्गम क्षेत्रात असतात असे गृहित धरले तरी चोवीस तासांहून अधिक वेळ यासाठी लागता कामा नये. आजचा काळ हा मोबाईल व इंटरनेटचा आहे. ही माहिती एका सेकंदात इकडून तिकडे पाठवता येऊ शकते. एरवी आपण इव्हीएम ही आधुनिक तंत्रज्ञानावर आधारलेली यंत्रणा वापरतो म्हणून स्वतःचे कौतुक करून घ्यायचे आणि दुसरीकडे साधे एका मतदारसंघात किती मतदान झाले याच्या बेरजा करण्यात इतके दिवस घालवायचे? चंद्रावर किती वाजून किती मिनिटांनी यान उतरेल हे पृथ्वीवरून नियंत्रित करू शकणारे शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञान ज्या देशापाशी आहे त्याला मतदानाची बेरीज करायला इतका वेळ लागतो हे न पटणारे आहे. निवडणूक आयोगाने याबाबतचा दोष स्थानिक अधिकाऱ्यांवर ढकलण्याचा प्रयत्न केला आहे. तो तर अधिकच संतापजनक आहे. कारण, या देशात आजवर इतक्या निवडणुका झाल्या. त्यामध्ये कधीही या बेरजा करण्यास चोवीस तासांहून अधिक काळ लागलेला नाही. तीच यंत्रे, तीच यंत्रणा व माणसे आणि तरीही हा असा कारभार असेल तर त्याची जबाबदारी आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरच येते.


## न्यायालयाने विचार करावा

गेल्या आठ महिन्यांपासून निवडणुकीची तयारी चालू होती. शिवाय, यावेळी तब्बल दोन महिने मतदान चालणार आहे. एकेका फेरीत जेमतेम पाच-दहा मतदारसंघांमध्ये मतदान आहे. पूर्वी महाराष्ट्राचे मतदान दोन फेऱ्यांमध्ये पार पडत असे. आता पाच-पाच फेऱ्यांचे दळण दळले जात आहे. म्हणजे यंत्रणेवर ताण असण्याचाही प्रश्न नाही. असे असेल तर हा आयोग करतो काय असा सवाल आहे. या आयोगाने आणखीही एक अतर्क्य गोष्ट केली आहे. त्यांनी प्रत्येक मतदारसंघांमध्ये एकूण मतदार किती व त्यातील किती लोकांनी हक्क बजावला याचे प्रत्यक्ष आकडे दिलेलेच नाहीत. केवळ टक्केवारीच्या भाषेत ते सांगितले आहे. म्हणजे हिंगोलीत ६२ टक्के मते पडली इतकेच म्हटले आहे. त्यावरून नेमके किती मतदार यादीत होते व त्यापैकी किती जण आले हे कळतच नाही.हा प्रकार अत्यंत संशयास्पद आहे. ही ठोस आकडेवारी न दिल्यामुळे बाहेरून पेट्या आणून ती मते यात टाकली जाण्याचा धोका आहे असे विरोधकांना वाटते. ही भीती खोटी आहे हे स्पष्ट करण्याची जबाबदारी आयोगाची आहे. मात्र अजून तरी त्यांच्यातर्फे याचा नीट खुलासा समोर आलेला नाही. इव्हीएम किंवा मतदान यंत्रे यांच्याबाबतचा बहुसंख्यांमध्ये असलेला संशय अजून पुरता फिटलेला नाही. मतदानयंत्रात पडणारे प्रत्येक दुसरे वा तिसरे मत भाजपला जावे अशी व्यवस्था करणे शक्य आहे असे या क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे. दुर्दैवाने सर्वोच्च न्यायालयाने याची दखल घेण्यास नकार दिला. इव्हीएम मोजणी सोबतच व्हीव्हीपॅट किंवा मतांच्या पावत्यांची देखील मोजणी व्हावी अशी याचिका कर्त्यांची मागणी होती. यंदाच्या निवडणुकीत तसे केले जायला हवे होते. या दोन मोजण्यांमध्ये तफावत पडते की काय हे त्यामुळे तपासता आले असते. त्यात कदाचित एक-दोन दिवस जास्त गेलेही असते. पण त्या निमित्ताने एकदाच संशय फिटला असता. मतदानाचा टक्का दोन ते पाचाने वाढणे हादेखील अंतिम निकालांमध्ये धक्का आणि धोका देणारा ठरू शकतो. न्यायालयाने अजूनही विचार करावा.

विचार

# वारसा कराचा तापला मुद्दा

**सॅम पित्रोदा यांच्या वारसा कराबाबतच्या विधानाने भारतातील लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला खमंग फोडणी दिली. हा झटका महागात पडू शकतो, हे सम जल्यानंतर पित्रोदांनी पवित्रा बदलला. मुख्य मुद्यांवरून लक्ष विचलित करण्यासाठी आपल्या टिप्पण्यांना वेगळे वळण देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. वास्तवात अमेरिकेतील वारसा कराचा मुद्दा आपल्याकडे कितपत लागू का ठरतो हे समजून घेणे महत्वाचे आहे.**



**प्रा. अशोक ढगे**

निवडणुकीच्या काळात कोणतेही विधान जास्त जपून करावे लागते. आपले म्हणणे कितीही खरे असले आणि विचार कितीही क्रांतिकारी असला तरी तो समाजाच्या पचनी पडतोच असे नाही. त्यातही करांबाबत तर अधिक जागरूक राहावे लागते. निवडणुकीच्या काळात 'ध'चा 'मा' करण्याचे प्रकार जाणीवपूर्वक केले जातात. त्यातून स्पर्धक राजकीय पक्षाची कोंडी करण्याचा प्रयत्न होत असतो. अलिकडेच माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या भाषणाचा आणि काँग्रेसच्या जाहीरनाम्याचा आधार घेऊन देशात संपत्ती वाटण्याच्या मुद्याचे भाजपने भांडवल केले आहे. प्रेमात आणि युद्धात सारे क्षम्य असते, असे म्हणतात. आता निवडणूक युद्धासारखीच लढवली जात असल्याने तिच्यातदेखील सारे काही क्षम्य मानले जाऊ लागले आहे. त्यात एखादा मोठा नेता विधान करून जातो आणि प्रतिस्पर्धी पक्ष त्याचा यथोचित फायदा उठवतो. नेत्याच्या विधानाशी पक्षाने कितीही फारकत घेतली, तरी 'डॅमेज कंट्रोल' काही होत नसते. एका अर्थी नेताच पक्षाला अडचणीत आणत असतो. आधी सोनिया गांधी, मणिशंकर अय्यर यांनी मोदी यांच्यावर केलेल्या टीकेचे बुमरँग काँग्रेसवरच उलटले होते. त्याचा नव्याने आठव झाला. मात्र या निमित्ताने या मुद्द्याचा माग काढण्याची गरज निर्माण झाली.

देशात आर्थिक विषमता टोकाची असले तरी संपत्तीचे समान वितरण झाले पाहिजे असे म्हणणे स्वप्नवत आहे. एखाद्याने कष्टाने कमावलेली संपत्ती त्याच्याकडून सहजासहजी काढून घेणे अन्यायकारक आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की आर्थिक विषम ता दूर करूच नये. जादा संपत्ती राष्ट्राकडे घेतल्यानंतर तिचा उपयोग गरीबांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी होईलच असे नाही. त्यासाठी साम्यवादी देशाचा अनुभव पुरेसा बोलका आहे. श्रीमंतांवर अधिक कर लादून गरिबांच्या कल्याणाच्या योजना राबवणे हा मध्यममार्ग असतो. पण काही वेळा तोदेखील नीट वापरला जात नाही. अमेरिकेसारख्या राष्ट्रात एखादी कररचना चांगली आहे, म्हणजे ती भारतात चांगली ठरेलच असे नाही. हे लक्षात घेऊनच सॅम पित्रोदा यांच्या वारसा कराबद्दलच्या विधानामुळे काँग्रेसला बॅकफूटवर यावे लागले. मोदी, योगी आदित्यनाथ, मायावती आदी मंडळी पित्रोदा यांच्यावर तुटून पडली. अर्थशास्त्रज्ञ, तंत्रज्ञ राजकारणी नसतात. त्यामुळेच एखादी गोष्ट सुचली तरी ती कधी आणि कशी मांडावी किंवा मांडू नये याचे भान सुटले की काय होते, हे सॅम पित्रोदा आणि काँग्रेसलाही कळले असेल. एखादे वक्तव्य केले आणि अंगलट आले की आपल्या विधानाची मोडतोड करून दाखवली, अशी नेहमीची पळवाट शोधली जाते. परंतु प्रत्येक वेळी ती उपयोगी पडतेच असे नाही.

सॅम पित्रोदा हे नाव राजकारणात नवीन नाही. इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि मनमोहन सिंग यांचे सल्लागार राहिलेले पित्रोदा सध्या इंडिया ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. असे असले तरी पित्रोदा कामापेक्षा वक्तव्यामुळेच अधिक चर्चेत असतात. त्यांची विधाने काँग्रेससाठी डोकेदुखी ठरते. पक्षाला बचावाशिवाय पर्याय राहत नाही. अशी पार्श्वभूमी असताना पित्रोदा यांच्या वक्तव्याने पुन्हा एकदा काँग्रेसच्या अडचणी वाढवल्या. पित्रोदा यांनी निवडणुकीच्या काळात वारसा कराची वकिली केली. अमेरिकेत मोजक्या राज्यांमध्ये लागू असणाऱ्या या कराची वकिली करताना त्यांनी याचे रोचक वर्णन केले. वाद वाढत असल्याचे पाहून त्यांनी स्पष्टीकरण दिले. मात्र तोपर्यंत बराच उशीर झाला होता. ते म्हणाले, 'अमेरिकेत वारसा कर आहे. कोणाकडे शंभर दशलक्ष डॉलर्सची संपत्ती असेल तर मृत्यूनंतर त्याची ४५ टक्के मालमत्ता मुलांना दिली जाते आणि ५५ टक्के सरकारकडे जाते. याचा सरळ अर्थ हयातीत निर्माण केलेल्या संपत्तीपैकी अर्धी संपत्ती मृत्यूनंतर जनतेसाठी सोडावी लागेल. भारतात असा कोणताही कायदा नाही.' या वक्तव्यावर बराच वाद झाल्यानंतर पित्रोदा यांनी स्पष्टीकरण दिले. टीव्हीवरील संभाषणात मी अमेरिकेच्या वारसा कराचा केवळ उदाहरण म्हणून उल्लेख केला होता. लोकांनी अशा मुद्यांवर चर्चा आणि वादविवाद करावा, असे मी म्हटले होते; याचा काँग्रेससह कोणत्याही पक्षाच्या धोरणाशी संबंध नाही' असे त्यांनी नंतर म्हटले.

भाजपच्या वतीने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जनतेला पित्रोदा यांच्या वक्तव्याचा गांभीर्याने विचार करण्याचे आवाहन केले. त्यांच्या वक्तव्याच्या निमित्ताने काँग्रेसचे छुपे मनसुबे उघड झाले असल्याचे त्यांनी सांगितले. लोकांनी अशा धोरणाबाबत काळजी घ्यावी आणि काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यातून सर्वेक्षणाचा उल्लेख मागे घ्यावा, असे आव्हान त्यांनी केले. खेरीज अल्पसंख्याकांना आपले प्राधान्य नाही. गरीब, दलित, आदिवासी आणि मागासवर्गीयांना आपले प्राधान्य आहे हे सांगण्यास ते विसरले नाहीत. अन्य काही नेत्यांनीही पित्रोदा यांच्या विधानावर टीका केली. त्यामुळे काँग्रेसची अडचण वाढली. पित्रोदा यांच्या विधानापासून काँग्रेसने दूर राहणे पसंत केले. अर्थात वादग्रस्त विधान करण्याची पित्रोदा यांची ही पहिलीच वेळ नाही. २०१९ मध्ये त्यांनी शीख दंगलीवर असेच वादग्रस्त विधान केले होते. भारतीय जनता पक्षाच्या आरोपांवर ते म्हणाले होते की, '१९८४ चे काय, तुम्ही तुमच्या पहिल्या पाच वर्षात काय केले याबद्दल बोला. १९८४ मध्ये झाले ते झाले...' या विधानावर बराच गदारोळ झाला होता.

२०१९ मध्येच त्यांनी आणखी एक विधान केले होते. मध्यमवर्गीयांनी स्वार्थी नसावे, त्यांनी जास्तीत जास्त कर भरण्याची तयारी ठेवावी. तरच मध्यमवर्गीय कुटुंबांना रोजगार आणि अधिक संधी मिळतील...' या त्यांच्या विधानामुळेही काँग्रेसच्या अडचणी वाढल्या होत्या आणि तेव्हाही त्यांच्या पक्षाला 'डॅमेज कंट्रोल' करावे लागले. पित्रोदा इथेच थांबले नाहीत. ते २०१९ च्या पुलवामा हल्ल्याबाबत बोलताना ते म्हणाले होते की, असे हल्ले होत राहतात. मुंबईतही हल्ला झाला होता. त्यांनी बालाकोट हवाई हल्ल्याबाबतही पुरावे मागितले होते. २०२३ मध्ये पित्रोदा यांचे आणखी एक विधान काँग्रेसच्या गळ्यातला काटा ठरले. राम मंदिराबाबत ते म्हणाले होते की, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य या समस्या मंदिरांच्या उभारणीने सुटणार नाहीत. आपल्या देशात बेरोजगारी, महागाई, शिक्षण यासारख्या समस्या आहेत; पण त्यावर कोणी बोलत नाही.' अमेरिकेत राहुल गांधी यांच्या उपस्थितीत पित्रोदा यांनी हे वक्तव्य केले होते. त्यांचे विधान कितीही योग्य असले तरी मंदिर आणि प्रार्थनास्थळ हा भारतीयांच्या भावनेचा विषय असतो आणि त्यांच्या भावनांना ठेच लागली की परिणाम वाईटच होतात.

वारसा करावरील अलीकडील विधानावर गदारोळ उठल्याबाबत पित्रोदा म्हणाले, 'मी संपत्तीच्या पुनर्वितरणाबद्दल बोलतो तेव्हा नवीन धोरणे आणि नवीन कार्यक्रमांबद्दल बोलत असतो. मुख्य मुद्यांवरून लक्ष विचलित करण्यासाठी माझ्या टिप्पण्यांना वेगळे वळण देण्यात आले आहे. टीव्हीवरील संभाषणात फक्त उदाहरण म्हणून अमेरिकेच्या वारसा कराचा उल्लेख केला आहे. मी वस्तुस्थितीचा उल्लेख करू शकत नाही का? मी म्हणालो की हे असे मुद्दे आहेत; ज्यावर लोकांनी चर्चा आणि वादविवाद करावा. याचा धोरणाशी काहीही संबंध नाही. भारतात असे काहीतरी व्हायला हवे, असे कोणी म्हटले? भाजप आणि मीडिया का घाबरले आहेत?' असे अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले. वारसा करावरून मोदी यांनी काँग्रेसला धारेवर धरले. 'राजपुत्र' आणि 'राजघराण्या'चे सल्लागार (सॅम पित्रोदा) काही काळापूर्वी म्हणाले होते की मध्यमवर्गीयांवर अधिक कर लावला पाहिजे. काँग्रेस म्हणते की, ते वारसा कर लादतील. पालकांकडून मिळालेल्या वारसा हक्कावरही कर लादला जाईल. कष्टाने जमवलेली संपत्ती मुलांना देणार नाही तर काँग्रेसचे सरकार आले तर ती तुमच्याकडून हिसकावून घेतली जाईल. त्यांनी काँग्रेसला संपत्तीचे पुनर्वितरण करण्याच्या मुद्द्याचा समावेश आपल्या जाहीरनाम्यात समाविष्ट करण्याचे आव्हान दिले. जीवनात काँग्रेसकडून लूट आणि आयुष्यानंतरही काँग्रेसकडून लूट, अशी टीका त्यांनी केली.

भाजपने आरोप केला की गांधी घराण्याने त्यांच्या मुलांसाठी आणि सुनांसाठी मोठा खजिना निर्माण केला; पण त्यांना सामान्यजनांची कष्टाची संपत्ती हिसकावून घ्यायची आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील संपत्तीच्या वाटपावरून वादाची सुरुवात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली तेव्हा सांगितले की, त्यांच्या पक्षाने देशातील विविध स्तरातील लोकसंख्येमध्ये संपत्ती वितरणाचे मूल्यांकन करण्यासाठी एक व्यापक आर्थिक आणि संस्थात्मक सर्वेक्षण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. दरम्यान, काँग्रेसच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे की एकीकडे श्रीमंत आणि दुसरीकडे गरीब व मध्यमवर्ग यांच्यातील असमानता वेगाने वाढली आहे. त्यामुळे समानता, सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या उद्दिष्टांना धक्का बसला आहे. भारताच्या सर्वोच्च एक टक्क्याने कमावलेल्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा आज जागतिक स्तरावर सर्वोच्च आहे. २०१४ आणि २०२३ दरम्यान असमानतेत वाढ दिसून आली. हे खरे असले तरी आर्थिक विषमता कमी कशी करायची यावर खरे तर सत्ताधारी आणि विरोधकांनी एकत्र येऊन धोरण ठरवायला हवे. मात्र त्याऐवजी असे वाद झडताना दिसतात.

आजकाल

# क्षत्रियांच्या नाराजीमुळे भाजपला गुजरातेत दणका

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मायभूमी असलेल्या गुजरातमध्ये क्षत्रिय समाज तापला आहे. राजकोट लोकसभा मतदारसंघातील भाजपाचे उमेदवार केंद्रीय मंत्री पुरुषोत्तम रूपाला यांनी ऐन निवडणूक काळात केलेल्या एका वादग्रस्त वक्तव्यामुळे संपूर्ण समाज पेटून उठलाय. या प्रकरणाची सारवासारव आता भाजपाकडून केली जात आहे. सलग तिसऱ्या निवडणुकीत गुजरातमध्ये लोकसभेच्या २६ पैकी २६ जागा जिंकण्याचे भाजपाचे लक्ष्य आहे. परंतु, क्षत्रियांच्या नाराजीसमोर 'मोदी मॅजिक' किती प्रभावी ठरेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



गुजरातमधील काही भागांत वातावरण शांत झाल्याचे पाहायला मिळत आहे. या निवडणुकीच्या राज्यातील पहिल्या सभेसाठी मोदी गुजरातमध्ये दाखल होण्यापूर्वी, गुजरात राजपूत सम ाज संघटनांच्या समन्वय समितीने जाहीर केले की, ते पंतप्रधानांच्या कोणत्याही सार्वजनिक सभांमध्ये निषेध करणार नाहीत. पण, राजकोट येथील क्षत्रिय समिती कार्यालयात निदर्शनांची तयारी सुरू आहे. याचे नेतृत्व भाजपा राजकोट शहर युनिटचे माजी सरचिटणीस, राजकोट महानगरपालिका स्थायी समितीचे माजी अध्यक्ष व युवा भाजपचे माजी अध्यक्ष राजभा झाला करीत आहेत. ''आम्हाला अहंकारी भाजपला धडा शिकवायचा आहे,'' असे त्यांचे म्हणणे आहे.

भाजपाचा असा विश्वास आहे की, राजकोटमध्ये काहीच अडचण निर्माण होणार नाही. कारण येथील राजपूतांची संख्या केवळ ८० हजार आहे. क्षत्रियांच्या संख्येचा विचार केला, तर २० लाख मतदार असलेल्या या मतदारसंघात चार टक्के, जामनगर व कच्छसारख्या मतदारसंघात ११ टक्के व आनंदमध्ये ६० टक्के इतके क्षत्रिय आहेत. या मतदारसंघांतील भाजपाच्या सभा क्षत्रियांनी विरोध करून उधळून लावल्या आहेत. राजभा झाला यांच्या मते, राजकोटमध्ये काँग्रेसचे उमेदवार परेश धनानी यांना पाठिंबा देणाऱ्या मतदारांची संख्या वाढली आहे. १.५ लाख क्षत्रियांसह लेउवा पाटीदार मते आणि मालधारी मते मिळतील, असेही झाला यांनी सांगितले. काँग्रेसचे उमेदवार परेश धनानी लेउवा पाटीदार आहेत; तर रूपाला कडवा पाटीदार आहेत. विशेष म्हणजे ते दोघेही स्थानिक नसून, अमरेलीचे आहेत. रूपाला यांच्या वक्तव्यानंतर करणी सेनेने याच्याविरोधात अनेक आंदोलने केली आहेत. महाराणा प्रताप ते भावनगरचे तत्कालीन महाराजा कृष्णकुमारसिंह गोहिल यांच्यापर्यंत सर्वांच्या कार्याचा या निदर्शनांमध्ये लेखाजोखा मांडण्यात आला आहे. समाजाची संरक्षक देवता असलेल्या आशापुरा माँ यांच्या सन्मानार्थ पाच 'क्षत्रिय अस्मिता धर्म रथ' क्षत्रिय बहुल गावातून फिरविले जात आहेत, तर मायाबा जडेजा यांसारख्या महिला नेत्या निवासी सोसायट्यांमध्ये धार्मिक कार्यक्रम आयोजित करीत आहेत.

जामनगरपासून सुमारे १०० किमी अंतरावर असलेल्या खंभलिया गावात 'क्षत्रिय धर्म रथ'चे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. मंदिरांमध्ये जोरदार भाषण करण्यात आले. ''आम्ही इथे राजपूत एकतेसाठी आलो आहोत. रूपाला यांना हटवायला आलो आहोत,'' असे भाषणांमध्ये बोलण्यात आले. भाजपाने जामनगरमधून दोन वेळा खासदार राहिलेल्या अहिर ओबीसी नेत्या पूनम मॅडम यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे. काँग्रेसने वकील जे. पी. मराविया यांना उमेदवारी दिली आहे. ते लेउवा पाटीदार समाजातून येतात.

रथ मिरवणुकीचे नेतृत्व करणाऱ्या श्री करणी सेनेच्या स्थानिक युनिटचे अध्यक्ष उपेंद्रसिंह जडेजा म्हणतात की, क्षत्रिय महिलांनी सार्वजनिक ठिकाणी जाणे सामान्य नाही. पण, रूपाला यांच्या वक्तव्यांनी त्यांना खूप दुखावलं आहे, असं ते म्हणतात. खरं तर, त्याच जास्त दुःखी आहेत. कारण- हे वक्तव्य त्यांच्यावर करण्यात आल्याचे जडेजा सांगतात. रथयात्रेत काँग्रेसला मत देण्याची शपथ घेतली जाते. उपेंद्रसिंह म्हणतात की, त्यांना दुसरा पर्याय नसल्यामुळे हे पाऊल उचलावे लागले आहे. शेतकरी नरेंद्रसिंह जडेजा म्हणतात की, क्षत्रिय निषेधाच्या पार्श्वभूमीवर इतर समुदाय जे बोलण्याची हिंमत दाखवीत नाहीत, ते आमच्या समर्थनासाठी पुढे येत आहेत.

लोकसंसद

## जीएसटी सर्वोच्च संकलन

सरकारने एप्रिल २०२४ मध्ये वस्तू व सेवाकर संकलन विक्रमी अर्थातच २. १० लाख कोटी रुपयांचे केले. हे आत्तापर्यंतचे सर्वोच्च संकलन केले. यापूर्वी एप्रिल २०२३ मध्ये जीएसटी संकलन १. ८७ लाख कोटी एवढे झाले होते. गेल्या वर्षीच्या याचा कालावधीपेक्षा म्हणजेच एप्रिल २०२३ पेक्षा हे प्रमाण १७. १ टक्क्यांनी अधिक आहे. या जीएसटी संकलनात महाराष्ट्राचा वाटा सिंहाचा असून तो पहिल्या नंबरवर आहे. महाराष्ट्राने सर्वाधिक ३७६७१ कोटी रुपये संकलन केले आहे. त्या खालोखाल कर्नाटक आहे. गुजरात तिसऱ्या क्रमांकावर आहे. जीएसटी संकलन वाढत आहे याचाच अर्थ अर्थव्यवस्था वेगाने पुढे जात आहे. अनेक व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. उधोग व व्यवसाय वाढीस लागले आहेत. त्याचा अर्थ जीएसटी वाढण्यात झाला आहे. गेली काही वर्षे भारतीय अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे . जगात ती लवकरच तिसऱ्या क्रमांकावर येईल यात शंका नाही भारतापुढे आज दोन महत्वाचे प्रश्न आहेत एक म्हणजे बेरोजगारी व दुसरा म्हणजे महागाई. आज अनेक प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत देशात महागाई आटोक्यात आहे. ती वाढली आहे पण आटोक्यात आहे. मात्र बेरोजगारीच्या प्रश्नावर सरकारने लक्ष दिले पाहिजे त्यांच्या कौशल्याचा उपयोग देशासाठी करून घेतला पाहिजे.

**शांताराम वाघ पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**चार मे**

**१८९०:-** तत्वज्ञ, नवविचारप्रवर्तक श्रीधर गणेश भालेराव यांचा जन्म. 'गीतेचे रचनांतर','पुर्नजन्म विरुध्द पुर्नजन्म, वैयक्तिक अमरत्व' या ग्रंथासह 'आपोआपी' हे पुस्तक त्यांच्या नावावर आढळते. अनंत ब्रम्ह आणि सात्त जग, अव्यय ब्रम्ह आणि नश्वर सृष्टी यांचे अस्तित्व एकाच स्थळी, एकाच काळी असून त्याचा संबंध गर्भगर्भिणी सारखा असतो. असे सुत्र भालेरावांच्या ग्रंथलेखनाच्या मुळाशी होते. याची प्रचिती वैयक्तिक अमरत्व, सुख दुःख विवेक आदी निबंधातून दिसते. याशिवाय त्यांनी ५० निबंध पुस्तिका आणि तीन ग्रंथ 'भारद्वाज' या गोत्रनामाने रचले. 'आईनस्टाईन प्रणित सापेक्ष दर्शन' हा ग्रंथ विज्ञानापेक्षा तत्त्वचर्चेकडे अधिक झुकतो. मराठीत अशा विषयावरील हा पहिलाच ग्रंथ. भारतीय दर्शनग्रंथाचे विवेचक हा त्यांचा आणखी एक ओळख. **१९००:-** लेखक, चरित्रकार, वृत्तपत्रकार रामचंद्र गोविंद कानडे यांचा जन्म १९०० रोजी भोर येथे झाला. येथील टिळक विद्यापीठातून वाङ्मयविशारद ही पदवी त्यांनी संपादन केली काही काळ त्यांनी मुंबईच्या लोकमान्य दैनिकात वृत्तलेखक म्हणून नोकरी केली. पुढे तळेगावच्या समर्थ विद्यालयात काही काळ शिक्षक होते. कालांतराने शिक्षकी पेशा सोडून ज्ञानप्रकाश या दैनिकात उपसंपादक म्हणून रुजू झाल्यावर आयुष्यभर वृत्तपत्र क्षेत्राशीच ते निगडीत राहिले. वृत्तपत्राच्या कामाच्या ढिगाऱ्यातून वेळ काढून त्यांनी रवींद्रनाथ टागोर, गुरुवर्य वि. गो. विजापूरकर आणि जगदीशचंद्र बसू आदींची चरित्रे लिहिली. तथापि त्यांनी लिहिलेला' मराठी नियतकालिकांचा इतिहास' या ग्रंथातून १०० वर्षांच्या मराठी नियतकालिकांचा व वृत्तपत्रांचा आढावा घेतला आहे. या महाग्रंथाच्या पहिल्या भागातून मुद्रणकलेच्या प्रगतीची माहिती दिली आहे. दुसऱ्या भागात नियतकालिकांचा म्हणजे मासिके, त्रैमासिक तर तिसऱ्या भागात मराठी वृत्तपत्रांचा इतिहास दिला आहे. चौथ्या भागातून हिंदुस्थानातील वृत्तपत्रे व मराठी वृत्तपत्रे यांची माहिती दिली आहे. यातून वृतपत्राची प्रगती. पाश्चात्य वृत्तपत्राचे अनुकरण, अँग्लो इंडियन वृत्तपत्रे, हिंदी वृत्तसंस्थेचा अपूर्ण विकास, वृत्तपत्रांचे वाढते महत्त्व, वृत्तपत्रांचा खप मराठी वृत्तपत्रांचा व्याप व खप आदीबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. याशिवाय पाचव्या भागात वृत्तपत्रांचे महत्त्व व सहाव्या भागात वृत्तपत्रांच्या उज्ज्वल भविष्यकाळासंबंधीचे विचार मांडलेले आहेत. सातव्या भागातून वृत्तपत्र व्यावसायिकांचा परिचय करून देण्यात आला आहे. मराठी नियतकालिकांच्या इतिहासाचे दुर्मिळ साहित्य मोठ्या कपष्टाने जमा करून त्या आधारे ग्रंथ लिहिले. १८३२ ते १८९२ या काळातील नियतकालिकांतील उतारे तसेच जुन्या पत्रकारांची छायाचित्रे त्यांची चरित्र या ग्रंथात आढळतात. वयाच्या अवघ्या ४९ व्या वर्षी ५ सप्टेंबर १९४९ रोजी त्यांचे निधन झाले. **१९०२:-** कथा-कादंबरीकार आणि क्रांतीकारकांचे इतिहासकार शंकर दिनकर करंदीकर यांचा जन्म. 'प्रतिव्रता साहित्यिक, ही पौरोणिक तर पुष्पराणी' ही सामाजिक कांदबरी, 'अत्तरदाणी' हा कथासंग्रह प्रसिध्द. **१९०८:-** पुढारीकार डॉ. गणपतराव गोविंदराव जाधव यांचा जन्म. **१९१८:-** अद्भुतवादी निसर्ग कवितेच्या प्रवाहाला नितळ मराठी रुप देणारे 'बालकवी' म्हणजेच त्र्यबंक बापूजी ठोंबरे यांचे निधन. वयाच्या १३ वर्षी लिहिलेल्या 'वनमुकुंद' या कवितेपासून अव्याहत काव्यलेखन करणारे बालकवी २८व्या वर्षी रेल्वे रूळ ओलांडताना जिवास मुकले. आनंदी आनंद, फुलराणी, अरुण, निर्झरास, औदुंबरफ या कविता त्यांच्याच आणि 'सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबुनि घ्यावे' किंवा 'स्वार्थाच्या बाजारात, किती पामरे रडतात, त्यांना मोद कसा मिळतो? सोडूनि स्वार्था तो जातो' सारख्या काव्यपंक्ती लिहिणारे बालकवीच! 'बालकवींची कविता' या समग्र काव्यसंग्रहाची गोडी आज ९५ वर्षानीही टिकून आहे. **१९२९:-** ख्यातनाम कादंबरीकार बाबा कदम यांचा जन्म. ५० कादंबऱ्या, ६ लघुकथा त्यांच्या नावावर. त्यांच्या कादंबऱ्यांवर अनेक चित्रपट निघाले. **१९२९:-** कवी, कादंबरीकार दत्तात्रय भिकाजी रणदिवे यांचे निधन. फारसे शिक्षण नसतानाही विविध विषयांच्या डोळस वाचनाने ज्ञानात भरून विपूल प्रमाणात साहित्याची निर्मिती त्यांच्या हातून झाली. 'सुमति' हे सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणारे मासिक त्यांनी काढले. तसेच साधी नीती, आर्यारत्नकांड' मिळून पाच काव्यसंग्रह याशिवाय 'सरस वाड्:मय मालेसाठी त्यांनी 'नगरतारका', 'अंजनासुंदरी' मिळून बारा कादंबऱ्या लिहिल्या. **१९५३:-** कथा, कविता, समीक्षा आदी स्वरुपाचे लेखन करणारे आणि ऋचा-हायकू विशेषांकाचे संपादन करणाऱ्या लेखिका डॉ. अंजली सतीश कीर्तने यांचा जन्म. त्यांचा फॅशन फ्लॉवरफ हा अकरा मनोविश्लेषणात्मक कथांचा संग्रह प्रसिध्द झाला आहे. **१९५८:-** लेखक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अर्जुन ठकाजी कोकाटे यांचा जन्म. 'अस्वस्थ शतक' हा काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहे. **१९८०:-** अजातशत्रू आणि चतुरस्त्र साहित्यिक अनंत आत्माराम काणेकर यांचे निधन. 'चित्राफ साप्ताहिकाचे संस्थापक-संपादक म्हणून लघुनिबंध या प्रकाराला त्यांनी नेटके लालित्य दिले. 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे', 'रक्ताची फुले' या प्रवासवर्णनांनाही साहित्यिक बाज दिला, सात नाटके लिहिली आणि नवकथेच्या प्रवाहातही सामील झाले, परंतु मुळचे ते कवी. 'चांदरात व इतर कविता' हा काव्यसंग्रह रुढ काव्यविचाराला धक्के देणारा ठरला. **२०२२:-** मानवी मनाचे विविधांगी दर्शन घडवणाऱ्या आणि जीवनविचारी कविता लिहिणाऱ्या कवयित्री रजनी परुळेकर यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे



४ मे

१) श्री. अनंत हरी पाटील
चेंढरे-अलिबाग, ४-५-१९४६

२) श्री. रमेश प्रभाकर जगे
ब्राम्हणआळी अलिबाग, ४-५-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**श्री. उन्मेश दत्ताराम पाटील, वाढदिवस, अलिबाग**

# शाळेला प्रिंटरची भेट



**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी प्राथमिक शाळेस प्रिंटर भेट देण्याचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

तळवली तर्फे अष्टमी या गावचे प्रतिष्ठित नागरिक तथा सामाजिक कार्यकर्ते एकनाथ मरवडे यांचे सुपुत्र प्रज्योत यांच्या संपन्न झालेल्या विवाह सोहळ्याप्रित्यर्थ हळदी समारंभाच्या कार्यक्रमात एकनाथ मरवडे आणि त्यांच्या परिवारावराकडून सदरचे प्रिंटर शाळेस भेट स्वरूपात देण्यात आले आहे. आपल्या गावात व समाजात नेहमीच सामाजिक बांधिलकी जपून विविध माध्यमांतून सहयोगाची भावना जोपासणारे एकनाथ सटू मरवडे आणि त्यांच्या संपूर्ण परिवाराची याबाबतीत विशेष ख्याती आहे. आणि त्याच भावनेतून त्यांनी प्राथमिक शाळेस प्रिंटरची भेट देण्याचा कार्यक्रम प्रज्योत याच्या हळदी समारंभाचे कार्यक्रमात संपन्न करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ, मरवडे परिवारातील सदस्य, आप्तस्वकीय, मित्रपरिवार, सगेसोयरे व प्राथमिक शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## रोहा न्यायालयातील सहाय्यक अधीक्षक आरती दिवेकर सेवानिवृत्त



**। नागोठणे । वार्ताहर ।**

रोहा येथील कनिष्ठ स्तर दिवाणी व फौजदारी न्यायालयातील सहाय्यक अधीक्षक आरती दिवेकर या न्यायालयीन कामकाज प्रक्रियेतील आपल्या ३७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाल्या.

आरती दिवेकर यांना रोहा न्यायालयात आयोजित करण्यात आलेल्या एका छोटेखानी निरोप समारंभ कार्यक्रमात निरोप देण्यात आला. रोहा न्यायालयातील मुख्य न्यायाधीश सुनील महाले, सहन्यायाधीश मेघा हासगे, उदय दिवेकर आदींसह आरती दिवेकर यांचे कुटुंबीय, न्यायालयातील वकील, मित्रपरिवार व कर्मचारी उपस्थित होते.

आरती दिवेकर या सन १९८७ मध्ये ठाणे जिल्हा न्यायालय अंतर्गत असलेल्या कल्याण येथील तालुका न्यायालयात ज्युनिअर क्लार्क म्हणून सेवेत रूजू झाल्या होत्या. तेथे त्यांनी चार वर्षे काम केले. नंतर जिल्हा बदली करुन रायगड जिल्ह्यात अलिबाग जिल्हा न्यायालय येथे त्या सेवेत रूजू झाल्या होत्या. त्यानंतर रोहा, पाली, पनवेल पुन्हा अलिबाग येथील न्यायालयात त्यांनी इमानेइतबारे सेवा केली.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळवण्यात येते कि, आमचे अशिल सौ. वर्षा चंद्रशेखर कुवळेकर यांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. अनंत गोविंद भगत, २) श्रीमती. कुंदा गोविंद भगत ३) सौ. सुमित्रा शांताराम भगत, ४) श्री.सतीश शांताराम भगत ५) श्रीमती. सुवर्णा शांताराम भगत ६) श्रीमती. सुगंधा शांताराम भगत यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरवले असून आमचे अशिल व विरहीत असल्याचे भरवसा आमचे अशिलास विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे मालकी हक्का बाबतचा शोध घेणेकरिता व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्याचे त्याचा खातरजमा करणे कामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचे कडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| बामणगाव,ता.अलिबाग जि. रायगड | २१५ | एकुण ला.यो-०-३७-४० पो.खा.-०.०५.६० एकुण क्षेत्र (अ+ब)- ०.४३.०० | ३.५० |

सदरवर नमुद केलेल्या क्षेत्र मिळकतीमधील एकुण क्षेत्रा पैकी ०.२२.०० हे. आर हि मिळकत या जाहीर नोटीसिच्या विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फोरोक्त, पोटगी, साठेकारार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याचाकडे मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : ०३/०५/२०२४

**अ‍ॅड.पल्लवी तुळपुळे**
बी.कॉम. एलएल.बी.एम.एम.एस.डी.सी.एल.
अलिबाग-रायगड
मो नं. ९९२१५५०६७६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत हि खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे मुकटे, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | एकुण क्षेत्र हे आर | आकार रु.पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| विनायक राजाराम जाधव | ९५ | वरकस ०-८४-०० पो.ख.०-७७-०० १-६१-०० पैकी विनायक राजाराम जाधव यांचे मालकीचे क्षेत्र ०-२०-०० आर | ०=६२ ०=०८ | १ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे आशिल यांनी जमीनमालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार लिएन चार्ज, ॲटचमेंट अन्न, वस्त्र, निवारा ताबा कब्जा वहिवाट वचनचिठ्ठी दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (१४) चौदा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. ०४/०५/२०२४

सही /-
**ॲड. प्रेरित पी वलिवकर**
रा.''यशवंत'' आदर्श नगर, सरकारी गोडाउन जवळ, मु. भुवनेश्वर, पो.वरसे, ता. रोहा, जि.रायगड,
मोबा क्र. ८४१२८६९०५९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनकडून आमचे अशिल गोलासिंग प्रेमसिंग दुधानी हयांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या गवतपड/राबपड जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- शेलु ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./ हिस्सा नं. | क्षेत्रः हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| श्री. गुरुनाथ सदानंद मसणे | १३३/१२/ब | एकुण :-०-१६-५५ | ०.१६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता : लक्ष्मी अपार्टमेंट, सदनिका कं. १०८ पहिला मजला, शेलु स्टेशन जवळ (पू), बांधिवली. ता. कर्जत, जि. रायगड.
ठिकाण: कर्जत

सही/-
**ॲड. सूर्यकांत भाऊ मसणे,**
दिनांक : ०४/०५/२०२४
मो.नं.९९२२१५५१५३,

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नारंगी, ता. अलिबाग जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विदयमान मालक श्री. नितिन बळीराम माळी यांच्या कडून त्यांच्या सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची खात्री मालकानी दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र हे आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| नारंगी ता. अलिबाग | ३९/६ | ०-२४-९० + ख ०-०२-०० एकुण ०-२६-९० | ३.०० |

वरील मिळकती पैकी श्री. नितिन बळीराम माळी यांच्या मालकीची ०-१२-०० हे. आर ही मिळकत सदरच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्युपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्यानेही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तकार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक ०२/०५/२०२४

**ॲड. सुजित पां. पाटील**
ऑफीस नं. १, शिवराम भास्कर बिल्डींग, बाजारपेठरोड, केळकर नाका, अलिबाग
मो.नं.-९८८१४४५३५२

## आदई गाव ब्रीजजवळ अज्ञात वाहनाची ठोकर लागून एका इसमाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेलजवळील आदई गाव ब्रीजजवळ अज्ञात वाहनाची ठोकर लागून एका इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. यातील पादचारी नामे सुनील प्रतापसिंग गुजर (३२) राहणार मध्यप्रदेश हे मुंबई लेन वर कि.मी. ०२-७०० येथे आले असता सदर पादचारी रस्ता क्रॉस करीत असताना पुण्याकडून मुंबईला जात असणाऱ्या अज्ञात वाहनाची ठोकर लागून अपघात झाला आहे. सदर अपघातात पादचाऱ्यांना डोक्याचा पाठीमागील उजव्या बाजूस गंभीर दुखापत झाली असून, सदर इसमास ॲम्ब्युलन्सच्या डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले आहे. या अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### जाहीर नोटीस

कि.ची.अ.क्र.३/२०२३

श्री. आफरीन अख्तर कूर
वय ३० वर्षे, व्यवसायः गृहिणी, — अर्जदार
रा. सोगाव, पो. मापगांव,
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुद्ध

ग्रामपंचायत चेंढरे
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर जाहीर नोटीशीव्दारा तमाम जनतेस कळविण्यात येते की.

१.अर्जदार ही वरील पत्त्यावर रहात असून अर्जदार हिचा जन्म दिनांक ०४/०९/१९९४ रोजी मोजे-सुर्वणा हॉस्पिटल, अलिबाग येथे झालेला आहे.

२.अर्जदार यांचे आईवडील कायमस्वरूपी सोगांव, ता.अलिबाग येथेच मुक्कामास आहेत. अर्जदार हिच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत चेंढरे, ता. अलिबाग येथे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये करण्याची नजरचुकीने तिच्या आईवडीलांकडून राहून गेली त्यामुळे अर्जदार हिस तिच्या जन्माचा दाखला ग्रामपंचायत चेंढरे, ता. अलिबाग येथून मिळणे आवश्यक आहे.

३. मात्र त्यांच्या जन्म नोंद ग्रामपंचायत चेंढरे येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत चेंढरे यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

तरी, सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२२/०५/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

अर्ज दिनांक ०६/०३/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्यासह दिली.

सही/-
**(विक्रम पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार अलिबाग**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विदयमान मालक विरल बकुल बलसारी यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ५१ | १/ब/१ | ०-२५-०० | ०-१७ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपटटा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०४/०५/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर, मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १) श्री. गणेश शामराज यादव, २) श्री. ईशवरलाल शामराज यादव, ३) श्री.मुकेश शामराज यादव, यानी मौजे साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन : मौजे साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| १) रईस साबीर कोइलकर, २) वसीम अनिस डोंगरे, | ३९ | ६/ब/१ | ०-२०-०० | ०-१२ |

वरील मिळकती हया आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. ४/०५/२०२४.

**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मो.९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु.पो.नेरळ (मोहाचीवाडी),
ता.कर्जत, जि.रायगड
मो.- ९८५०७६७५६८

### जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक मिलिंद दिनकर कोर यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

मौजे डोणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे महसुल दफ्तरी वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| भूमापन क.व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.प्रती) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ९/८ | ०.१०.६० | ०.५९ |
| ९/४ | ०.११.६० | ०.६२ |
| ९/१ | ०.१२.९० | ०.७५ |
| ९/५ | ०.२२.५० | १.२५ |
| ९/२ | ०.१४.०० | ०.८१ |
| ८/३ | ०.०९.१० | १.३१ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विकी, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक: ०४/५/२०२४

**ॲड. उमेश आनंद भगत**
(अधिवक्ता)
मु. पो. चिंचवळी ता.कर्जत
जि. रायगड
मो.नं.९०४९४८६८०५

### जाहिर नोटिस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यांस येते की मौजे पेण म्हाडा कॉलनी वसाहत, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. सॅबेस्टाईन केलारीकल मार्कोसे यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. महेश अशोक पडवळ यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

जिल्हा व तुकडी रायगड, पोटतुकडी व तालुका पेण, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक कार्यालय पेण नगरपरिषदेच्या हद्दीतील मौजे पेण, येथील गुरूकुल म्हाडा कॉलनी वसाहत पेण येथील सर्व्हे नं २५४ अ/पी- ४ मधील भूखंड क्र. १७ मध्ये असलेल्या वाहनतळ + तळ + एक मजल्याचे एकूण क्षेत्र ७३.५० चौ.मी त्याचा जुना मालमत्ता क्र. PENN०००१२४४८, नविन मालमत्ता क्र.W१Z२०१२६३४ असा असून वॉर्ड नं.१ झोन २.

वरील मिळकत आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः- सदर नोटीस खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाणः- पेण
दिः- ०३/०५/२०२४

सही/-
**ॲड. हेमा.ज.पाटील (घोडिंदे)**
साई श्रद्धा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२, प्रभु आळी, पेण

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. अभिषेक रत्नकांत जाधव, रा. धामोते, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन सह दुय्यम निबंधक कार्यालय कर्जत २ यांचे कार्यालयात दिनांक ०७/०५/२०१८ रोजी नोंदविलेला विक्री करारनामा दस्त क्र.२३१९/२०१८ हा मुळ दस्त गहाळ झालेला आहे.

**दस्तातील निवासी सदनिकेचे वर्णन :-** मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत सर्व्हे नं. १०१ प्लॉट नं. २ व ३ या मिळकतीवर बांधलेल्या 'शुभारंभ गार्डन' या इमारतीमधील निवासी सदनिका क्र. ०१ (फ्लॅट क्र.०१), तळ मजला, ज्याचे क्षेत्र १५.२५० चौरस मिटर कारपेट आणि ओपन टेरेस आणि बाल्कनी याचे क्षेत्र ३.४६७५ चौरस मिटर इतके आहे.

माझे अशिलांनी सदर दस्त हरविल्याबाबत तक्रार (तक्रार नं.०१४१/२०२१) नेरळ पोलीस ठाण्यामध्ये दिनांक २६/०४/२०२४ रोजी नोंदविलेली आहे. सदर मुळ दस्त जर कोणा व्यक्तीला सापडल्यास त्यांनी खाली नमुद केलेल्या पत्त्यावर सदर दस्त परत करावा ही विनंती.

ठिकाण : नेरळ
दिनांक : ०४/०५/२०२४

सही /-
**ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
कार्यालयीन पत्ताः- शॉप नं.२,
तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ
बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, ता. कर्जत,
जि. रायगड. ४१०१०१.
मो. नं. ९३७२९६४६६५

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १) श्री.संतोष बाबाजी भोईर २) कु. ऋतिक संतोष भोईर, यानी मौजे नारळाचीवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन : मौजे नारळाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| सौ.सुरेखा शैलेश घोलप | २१ | ५/अ | ०-५४-०० यापैकी ०-३४-०० | ०-२७ |

वरील मिळकती हया आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. ४/०५/२०२४.

**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मो.-९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु.पो.नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९८५०७६७५६८

### जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) संदर्भामध्ये मयुरी राजेंद्र म्हात्रे, रिद्धी राजेंद्र म्हात्रे, राज राजेंद्र म्हात्रे, विलास कृष्णा म्हात्रे, भालचंद्र कृष्णा म्हात्रे, नुतन नरेश भगत (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि / किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-टेकाळी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित

भूमापन क्रमांक व उपविभाग १३५, एकूण क्षेत्र ०-०८-०० (हे.आर.चौ.मी.) आकार ० रु.१४ पै.,
भूमापन क्रमांक व उपविभाग १४५, एकूण क्षेत्र ०-१४-५० (हे.आर.चौ.मी.) आकार २ रु.६६ पै.,
भूमापन क्रमांक व उपविभाग १४८, एकूण क्षेत्र ०-०९-५० (हे.आर.चौ.मी.) आकार ० रु.९० पै.,

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०४/०५/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

# विरोधकांच्या प्रचारातील हवा निघून गेली

## इंडिया आघाडीच्या प्रचारसभांना मतदारांचा प्रतिसाद ◂◂ प्रचाराच्या अंतिम टप्प्यात उडतोय राजकीय धुरळा

। रायगड । खास प्रतिनिधी ।

**इंडिया आघाडीतील नेते हे थेट मराठा, ओबीसी, दलित, मुस्लिम समाजातील प्रश्नांना थेट हात घालत आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रचारसभांना अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे. विरोधकातील काही पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनादेखील जनतेशी निगडीत असणारे मुद्दे पटत असल्याचे दिसून येते. याच कारणांनी आता विरोधकांच्या प्रचारातील हवा निघून गेली नाही ना असा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रचार आता शेवटच्या टप्प्यात आल्याने रायगडचे राजकीय रणांगण अजून तापणार आहे.**



पारा चाळीशी पार झाला असतानाच दुसरीकडे रायगड लोकसभा मतदार संघामध्ये प्रचाराच्या रणधुमाळीने तापमान वाढवले आहे. प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांना उन्हाची कोणतीच तमा राहीलेली नाही. इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना निवडणुकीत जिंकवण्यासाठी त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे.

गेल्या आठ दिवसांमध्ये राज्याच्या बहुतांश भागांमध्ये कमालीचे तापमान वाढले आहे. वैशाख वणव्यात सूर्याच्या प्रकोपाचा सामना रायगडकरांना करावा लागत आहे. याच कालावधीत रायगड लोकसभा मतदारसंघात प्रचाराच्या तोफा धडधडत आहे.

इंडिया आघाडीचे शिवसनेचे उमेदवार अनंत गीते आहेत. गीते हे मशाल चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. शरद पवार, उध्दव ठाकरे, शेकापचे प्रमुख जयंत पाटील, आदित्य ठाकरे, राष्ट्रवादीचे जयंत पाटील, सुषमा अंधारे, चित्रलेखा पाटील, पंडित पाटील, आस्वाद पाटील, यांच्यासह अन्य प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते हे गीतेंच्या प्रचारासाठी जाहीरसभा, प्रचार रॅली, बाईक रॅली, कॉर्नरसभा मतदारांच्या भेटी घेत आहेत. सध्या उन्हाचा पारा हा चाळीशी पार झाला आहे. त्यामुळे उन्हाच्या झळा असह्य झाल्या आहेत. गीतेंच्या प्रचारासाठी अशा तळपत्या उन्हाची पर्वा न करता सर्वचजण मैदानात उतरले आहेत. विविध सभांमधून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. गीतेंच्या सभेला देखील मतदारांमधून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

प्रचारासाठी कार्यकर्ता हा स्वयंस्फूर्तीने मैदानात उतरत आहे. त्यामुळे उमेदवारामध्ये देखील बळ आले आहे. इंडिया आघाडी देशासाठी किती हिताची आहे. हे सांगण्यावर प्रमुख वक्ते भर देताना दिसत आहेत. परंतु,विरोधक मात्र त्याला टीका समजत आहे. मराठा, दलित, ओबीसी आणि मुस्लिम समाजाला भेडसावणारे प्रश्न मांडण्यात येत असल्याने विरोधातील कार्यकर्ते देखील खासगीमध्ये इंडिया आघाडीच्या प्रचारातील मुद्यांना दाद देत असल्याचे मतदारसंघात दिसून येते. याच कारणामुळे आता विरोधकांच्या प्रचारातील हवा निघाली असल्याचे बोलले जाते. प्रचार आता आपल्या हातातून निसटत असल्याचे दिसत असल्याने विरोधकांनी आता इंडिया आघाडीच्या नेत्यांवर बेछूट आरोप करण्यास सुरुवात केली आहे. परंतु, मतदार अतिशय सुज्ञ असल्याने त्यांनादेखील आता खरे काय आहे, ते उमगले असल्याने येत्या ७ मे रोजी मतपेटीतून धडा शिकवण्याची त्यांनी तयारी केली आहे.

# राष्ट्रीय कबड्डी खेळाडू शिवाजी भांदीग्रे यांचे आकस्मित निधन

। मुंबई । वार्ताहर।

स्टेट बँकेचे कबड्डी खेळाडू, प्रशिक्षक व मार्गदर्शक शिवाजी भांदीग्रे यांचे १ मे रोजी सायं. ७-०० च्या सुमारास परेल रुग्णालयात आकस्मित निधन झाले. परेलच्या बी. रघुवीर संघातून खेळणाऱ्या दादांनी महाराष्ट्र हायस्कूल नं. २ शाळेतून कबड्डी खेळण्यास सुरुवात केली. निधना समयी ते ८२ वर्षांचे होते.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व सूना असा परिवार आहे. ते दादा या नावाने कबड्डी वर्तुळात परिचित होते. उजवा कोपरा रक्षक असलेले दादा पायात झेप घेऊन पकड करण्यात माहीर होते. दादा चढाई देखील उत्तम करीत असत. खेळाडूच्या डोक्यावरून उडी मारण्यात ते तरबेज होते. पण खेळाडूपेक्षा ते अधिक रमले प्रशिक्षकाच्या भूमिकेत.

विरोधी संघातील खेळाडूंच्या खेळाचा अभ्यास करून त्याचा उपयोग आपल्या सहकारी खेळाडू कडून संघाच्या विजया करीता करून घेण्यात त्यांना अधिक रस होता. साऊथ कॅनरा स्पोर्टस् क्लब या संघाला पुनर्जीवित करून नावलौकिक मिळवून देण्यात शेखर शेट्टी यांच्या बरोबरीने दादांचा सिंहाचा वाटा होता.

कित्येक कबड्डी खेळाडूंना त्यांनी स्टेट बँकेत कबड्डी खेळाडू म्हणून भरती केले. कबड्डी खेळाबद्दल ते खूप आत्मीयतेने बोलत. सद्या ते ओम् कबड्डी प्रबोधिनी या संघटनेच्या माध्यमातून तरुण खेळाडूंना मार्गदर्शन करण्याचे काम करीत होते. त्यांच्या पार्थिवावर भोईवाडा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# उल्हास नदी येथील चांदई पुलाला बसविले सुरक्षा कठडे

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवर चांदई येथे नव्याने पूल उभारण्यात आला होता.साडे चार कोटी रुपये खर्च करून बनविण्यात आलेल्या पुलाला दोन्ही बाजूंनी सुरक्षा कठडे ठेकेदाराने बनविले नव्हते.मात्र त्याबाबत स्थानिक रहिवाशी आणि वाहनचालक यांच्याकडून सतत होणारी मागणी यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने अखेर रेलिंग बसवून घेतली आहे.



चांदई येथे २००० साली पूल बांधण्यात आला होता मात्र तो अरुंद होता. त्यामुळे दुसरा पूल उभारण्याची मागणी सातत्याने होत होती.उल्हास नदीवर चांदई येथे पूल बांधण्याचे काम मंजूर झाले. त्या पुलाचे बांधकाम पूर्ण होऊन मार्च २०२४ मध्ये त्यावरून वाहतूकही सुरू झाली आहे.कोणत्याही पुलाचे बांधकाम केले जात असताना पुलाच्या दोन्ही बाजूला संरक्षण कठडे उभारले नाहीत.

उल्हास नदीवरील पुलावर संरक्षक कठडे उभारण्यात आले नसल्याबद्दल माजी सरपंच संतोष कोळंबे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अधिकाऱ्यांना ही बाब लक्षात आणून दिली होती. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम खात्याने लोखंडी रेलिंग बसवून घेण्याचे काम केले आहे.

# अपघातात तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** पायी चालत जाणाऱ्या तरुणाला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महादेव सरोदे हा सायन-पनवेल हायवे रोड, बेलपाडा बसस्थानक येथून पायी चालत जात होता. यावेळी भरधाव वेगाने आलेल्या वाहनाने त्याला धडक दिली. यात महादेव हा जखमी झाला. त्याला एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. यावेळी वाहन चालकाने जखमी महादेवला कोणत्याही प्रकारची मदत न करता वाहनासह पळ काढला.

# हुतात्मा भाई कोतवाल यांचे घर स्मारक घोषित करण्यास शासन असमर्थ

। माथेरान । वार्ताहर ।

स्वातंत्र्यसैनिकांना शासन पाच एकर जागा देत आहे.परंतु, भाई कोतवाल यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी, भावी पिढीला त्यांचा एक उत्तम आदर्श डोळ्यासमोर रहाण्यासाठी शासनाने या चिरंतर वास्तूला स्मारक घोषित करावे अशी मागणी स्थानिक भूमीपुत्रांमधून होत आहे.

शासन २ जानेवारी ,१५ ऑगस्ट ,२६ जानेवारी या दिवशी भाई कोतवाल यांच्या नावाचा जयजयकार होतो. नौरोजी उद्यानातील भाईच्या अर्धपुतळ्यास मान्यवर पुष्पहार अर्पण करतात.



परंतु,हुतात्मा भाई कोतवाल यांचे घर स्मारक घोषित करण्यास शासन असमर्थ ठरले आहे.

माथेरानमध्ये जन्म घेऊन वीरमरण पत्करणारे हुतात्मा भाई कोतवाल राहत असलेले त्यांचे जुने घर बाजारपेठेजवळ आहे. त्यांचे बंधु स्वातंत्र्यसैनिक पेन्टन्ना कोतवाल यांचे काही वर्षापूर्वी निधन झाले. त्यांचे वारसदार त्याच जुन्याच घरात आपले हलाखीचे जीवन कंठीत आहेत. यासाठी भाई कोतवाल यांची यशोगाथा अजरामर राहण्यासाठी त्यांचे घर शासनाने स्मारक घोषित करावे अशी मागणी होत आहे.

# आत्माराम बेतकर यांना मातृशोक

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जेएसडब्लूचे जनसंपर्क अधिकारी आत्माराम बेतकेकर यांच्या आई श्रीमती प्रभावती बेतकेकर यांचे अल्पशा आजारामुळे



त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ८४ वर्षांचे होते. दोडामार्ग, सिंधुदुर्ग येथील मूळ गावात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीला नातेवाईक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात त्यांचा मोठा परिवार आहे.

# 'जन्मठेप' नाटकाने ढोलपाडाकरांच्या जागविल्या ३३ वर्षांपूर्वीच्या स्मृती

। अलिबाग । प्रतिनिधी।

हनुमान नाट्यमंडळ, ढोलपाडा-आंबेपूर यांनी नाट्य कलावंत स्वर्गीय संभाजी महादू पाटील यांच्या स्मृती प्रीत्यर्थ कम लाकर बोरकर लिखित, विजया कुडव दिग्दर्शित जन्मठेप या दोन अंकी सामाजिक नाटकाच्या रंगतदार प्रयोगाचा आस्वाद शुक्रवार, २६ एप्रिल रोजी ढोलपाडा येथे नाट्यरसिकांनी घेतला. या प्रसंगी नाट्य अभिनेते स्वर्गीय संभाजी पाटील यांच्या पत्नीचा हृद्य सत्कार करण्यात आला.

ढोलपाडा येथे ३३ वर्षांपूर्वी हेच नाटक सादर झाले होते. त्या नाटकात संभाजी पाटील यांची नायकाची भूमिका होती, तर नायिका नाट्य अभिनेत्री विजया कुडव होत्या. या नाटकाचे अनेक प्रयोग झाले. संभाजी पाटील यांच्या निधनानंतर हनुमान नाट्य मंडळास नेहमी त्यांची पोकळी जाणवायची. अखेर त्यांच्या पवित्र स्मृती जागविण्यासाठी नाट्य अभिनेत्री विजया कुडव यांनी ३३ वर्षानंतर जन्मठेप नाटक दिग्दर्शित केले आणि त्या नाटकाचे प्रयोग झाले.

या नाटकात दिग्दर्शिका आणि अभिनेत्री विजया कुडव (राधा), सुनील बुरुमकर (शाम), प्रकाश नागू म्हात्रे (राम), नंदकुमार पाटील (लक्ष्मण), सुधीर पाटील (रावसाहेब), अनिल पाटील (पाटील), मोरेश्वर मोकल (भास्कर), अजित नरबेकर (सदा), प्रज्वल म्हात्रे (पोलीस इन्स्पेक्टर), सुरेशदादा पाटील (पोलीस इन्स्पेक्टर), अनिल गजानन पाटील (पोलिस) यांच्या भूमिकांनी मने जिंकून घेतली. या नाटकात ३३ वर्षानंतर प्रकाश म्हात्रे आणि नंदकुमार पाटील यांनी भूमिका केल्या.

# बालसाहित्य जत्रेचे उद्घाटन बालवाचकांच्या हस्ते संपन्न

। अलिबाग । प्रतिनिधी ।

२ मे पासून सार्वजनिक वाचनालय अलिबाग डोंगरे हॉल येथे उन्हाळ्याच्या सुट्टीत लहान मुलांमुलींसाठी 'बाल साहित्य जत्रा' एक आगळावेगळा उपक्रम आयोजित करण्यात आला. 'बाल साहित्य जत्रा' ही संकल्पना सार्वजनिक वाचनालयाच्या कार्याध्यक्षा शैला पाटील यांच्या संकल्पनेतून उदयास आली.



या बाल साहित्य जत्रेतील ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन बालवाचकांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, ग्रंथ मित्र पुरस्कार प्राप्त नागेश कुळकर्णी, सार्वजनिक वाचनालय अलिबागचे ग्रंथपाल भालचंद्र वर्तक, अ‍ॅड. राजेंद्र जैन, प्रमोद नगरे, विकेश गावंड, हेमंत खंडेराव राऊत, रंजिता माळवी, अर्चना माळवी, अमित धुमाळ, तंबी, बालगोपालांचा समुह तसेच वाचक वर्ग आदी उपस्थित होता.

# कार्ला गडावर स्वच्छता मोहीम

**रसायनी:** पाताळगंगा परिसरातील बिर्ला कार्बन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व आई एकवीरा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आई एकवीरा गड कार्ला लोणावळा येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी कार्ला गडाच्या पायथ्यापासून गडावरील परिसर स्वच्छ करण्यात आला. गडावर प्लास्टिक बॉटल, कचरा, कागदाचे गोळे व इतर टाकाऊ वस्तू गोळा करुन त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. प्लास्टिक बंदी जनजागृती म्हणून कापडी बॅग वाटप करण्यात आल्या.

# नेत्रचिकित्सा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




। नागोठणे । वार्ताहर ।

नागोठण्या नुकत्याच संपन्न झालेल्या नेत्रचिकित्सा शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नागोठणे लायन्स क्लबच्या वतीने व नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला संचलित शंकरा आय हॉस्पीटलच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात ७४ रुग्णांची नेत्रचिकित्सा करण्यात आली. यापैकी १९ रूग्णांना मोतीबिंदू आढळल्याने त्यांना शस्त्रक्रिया करण्यासाठी शंकरा आय हॉस्पीटलला नेण्यात आले.

नागोठण्यातील शांतीनगर भागातील स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यानात संपन्न झालेल्या या मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास नरेंद्र जैन, भाई टके, सदानंद गायकर, हरेश काळे, डॉ. राजेंद्र धात्रक, तानाजी लाड, जयराम पवार, प्रकाश जैन, यशवंत चित्रे, डॉ. अनिल गिते, सुधाकर जवके, विवेक सुभेकर, हरेश टके, सोपान जांबेकर, बाळासाहेब टके, सचिन कळसकर, प्रमोद जांबेकर, सिराज पानसरे, दिपाली टके, जान्हवी पंडित, पूनम काळे, मनोज टके, चेतन टके, पायल टके, मंगेश तेरडे, प्रथमेश काळे, सुभाष पाटील, संतोष लाड, भारत भोय, ध्रुव सोष्टे, सुजाता जवके, दौलतराम मोदी, दिपक गायकवाड, सुनिल कुथे, संतोष शहासने, दिपक लोणारी आदी उपस्थित होते.


# उरण तालुक्यात टँकरने पाणीपुरवठा

। उरण । वार्ताहर ।

रानसई ग्रामपंचायतीतील सहा आदिवासीवाड्यांना आणि चिरनेर ग्रामपंचायतीतील दोन आदिवासीवाड्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींनी तळ गाठल्याने आदिवासी बांधवांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे या दोन ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी बांधवांना भेडसावणारी पाण्याची समस्या दूर करण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा करण्याचा निर्णय उरण गटविकास अधिकारी समिर वाठारकर यांनी घेतला आहे.

रानसई व पुनाडे धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाण्याची पातळी खालावली आहे.त्यामुळे तालुक्यातील अनेक गावांमधील रहिवाशांना गढूळ पाणी पुरवठा होत आहे. रानसई धरणाच्या डोंगर कुशीत वसलेल्या रानसई ग्रामपंचायत हद्दीतील सहा आदिवासी वाड्यांना व चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील चांदायणी व केळाचामाळ या दोन आदिवासी वाड्यांना पाणीपुरवठा





करणाऱ्या विहिरींनी तळ गाठल्याने दोन्ही ग्रामपंचायत हद्दीतील रहिवाशांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पाण्याची समस्या दूर करण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी आदिवासी बांधवांनी केली आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- चेंबूर पूर्व मुंबई येथे स्टेशन जवळ ८६६ स्केअर फूट कारपेट बालकनी सह १ कारपार्किंग नवीन टॉवर ॲमेनीटी सह ताबा ३ महिन्यात मिळणार १० वा मजला नवीन कॉम्प्लेक्स मध्ये फ्लॅट विकणे आहे. मोबाईल : ९८२१२११४८०/९५७७२१६४९९
- कुकूचकू पोल्ट्री फार्म प्रा. ली. मध्ये कामगार पाहिजे निजामपूर माणगाव रायगड येथे पिल्लेच्या पीक अप गाडीवर ड्रायवर पगार सर्व साधारण रुपये २५,००० प्रती महिना व सुपरवायजर १० वी पास रुपये १३,००० प्रती महिना पगार मिळेल कुटुंबासहित राहण्याची, लाइट व पाण्याची मोफत सोय आहे. मापगाव अलिबाग येथे वॉचमन पाहिजे शिक्षण १० वी पास पुरुष कामाचे ८ तास पगार १०,००० प्रती महिना संपर्क :- अनुष्का राऊत मॅडम ७७९८८८३८६४
- मॉटेसरी टीचर, आया (attendant) व पार्ट टाइम बेकरी शेफ हवा आहे. आया किड्स ॲक्टीव्हीटी सेंटरसाठी व Owner च्या मुलाला सांभाळण्यासाठी हवी असल्याने घरी राहाणारीच बघत आहोत. अनुभवी किंवा जबाबदार व मुलांची आवड असणारी हवी. संपर्क ९९२०७५२१४१/९४२२६९२४५०
- विद्यानगरमध्ये Fully Furnished Attached रुम paying Guest साठी देणे आहे. जेवणासकट किंवा जेवणाशिवाय भाडे ठरवता येईल. (लेडीज किंवा मॅरीड कपल्ससाठी) संपर्क : ९९२०७५२१४१
- अलिबाग-चोंढी येथील रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. Receptions-Housekeeping-waiter-Helper-Cook etc. संपर्क- 8208459424/9323152990 Email. csskshrisnkar@gmail.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# कर्जत तालुक्यात पाणीटंचाईच्या झळा तीव्र

## चार गावे आणि ११ आदिवासी वाड्यांना टँकरची मागणी

## सद्यस्थितीत १० गावे-वाड्यांना टँकरने पाणी पुरवठा सुरू

। नेरळ । प्रतिनिधी ।

दुर्गम भाग असलेल्या कर्जत तालुक्यातील पाणी टंचाईने उग्ररूप धारण केले आहे. सध्या सात गावे आणि चार आदिवासी वाड्यांना शासनाच्या टँकरमधून पाणीपुरवठा होत आहे. मात्र पाणीटंचाई एवढी वाढली आहे की तालुक्यातील चार गावे आणि ११ आदिवासी वाड्यामध्ये टँकरने पाणी पुरवठा करावा अशी मागणी करणारे प्रस्ताव कर्जत पंचायत समितीकडे पोहचले आहेत.

कर्जत तालुक्यात दरवर्षी निर्माण होणारी पाणीटंचाई लक्षात घेवून शासनाने पाणीटंचाई कृती आराखडा तयार केला आहे.



त्यात संभाव्य पाणीटंचाई ग्रस्त गावे १८ असल्याचे आणि संभाव्य पाणीटंचाईग्रस्त वाड्यांमध्ये तब्बल ६० वाड्यांचा समावेश आहे. यावर्षी पाणीटंचाईचे दुर्भिक्ष नेहमीपेक्षा लवकर जाणवू लागल्याने एक एप्रिल रोजी कर्जत तालुक्यात पहिला टँकर शासनाच्या माध्यमातून सुरू झाला आहे. आतापर्यंत तालुक्यातील सात गावे आणि चार आदिवासी वाड्या यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.त्यात दरवर्षी तीव्र पाणीटंचाई असलेल्या ताडवाडी, मोरेवाडी, धाबेवाडी आणि बांगरवाडी येथे जलजीवनमधील नळपाणी योजना सुरू झाल्याने त्या चार वाड्या टँकर मुक्त झाल्या आहेत.

मात्र तरीदेखील दुर्गम आणि आदिवासी भागातील पाणीटंचाईची स्थिती यावर्षी अधिक नाजूक आहे. सध्या तालुक्यातील आषाने, मोग्रज, किरवली, खांनद, वर्णे, पिंगळस आणि मोहोपाडामध्ये शासनाच्या दोन टँकरमधून पाणीपुरवठा नियमित सुरू आहे. तालुक्यात पिण्याच्या पाण्याचे जलस्तोस्त्र यांची स्थिती बिकट झाली आहे.

बहुसंख्य विहिरी आटल्या असून अनेक बोअरवेल पाणी तळाशी गेल्याने नादुरुस्त झाल्या आहेत.त्यात जलजीवन मिशन मधील नळपाणी योजना यांची कामे रेंगाळली असल्याने पाण्याची स्थितीत दिवसेदिवस बिकट होत आहे. सध्या तालुका पंचायत समितीकडून १२ हजार लिटर क्षमतेच्या टँकरमधून पाणीपुरवठा केला जात आहे.

पिण्याच्या पाण्याची स्थिती गंभीर झाल्याने तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमधून पाण्याचे टँकर शासनाने पुरवावे अशी मागणी होत आहे. त्यात खासगी संस्था यांच्याकडून देखील टँकर ग्रामीण आणि आदिवासी भागात सुरू आहेत. परंतु, तरी देखील पाणी टंचाई कमी होण्याचे नाव घेताना दिसत नाही. पिण्याचे पाणी मिळावे यासाठी तालुक्यातील सहा ग्रामपंचायत मधील चार गावे आणि ११ आदिवासी वाड्याचे प्रस्ताव कर्जत पंचायत समितीकडे पोहचले आहेत. त्या सर्व ठिकाणी शासनाचे टँकर मधून पाणी पुरवठा करण्यात यावा अशी मागणी केली आहे. कर्जत पंचायत समिती कडून हे सर्व प्रस्ताव तालुका उपविभागीय अधिकारी यांच्या मंजुरी साठी पाठवले असल्याची माहिती मिळाली आहे.तालुक्यातील कळंब ग्रामपंचायतीमधील मिरचुलवाडी, मोग्रज ग्रामपंचायतीमधील आंबिवली, खांडस ग्रामपंचायतीमधील पेटार वाडी, वडाची वाडी, टेपाचीवाडी, पादीरवाडी, मेंगाल वाडी, जांभूळवाडी तसेच नांदगाव ग्रामपंचायतीमधील मोहपाडा, अंभेर पाडा ग्रामपंचायतीमधील बेलाची वाडी, काठेवाडी, आंभेरपाडा, तर बोरिवली ग्रामपंचायतीमधील सुगवे, नालधे, सराई वाडी येथे पिण्याचे पाण्याची टंचाई तीव्र झाली असल्याचे अहवाल स्थानिक ग्रामपंचायतीकडून कर्जत पंचायत समितीकडे पोहचले आहेत. मात्र गेल्या सहा दिवसात कर्जत पंचायत समिती तसेच उप विभागीय अधिकारी कार्यालयाने टँकर मंजूर केलेले नाहीत. त्यामुळे तेथील रहिवाशी आणि ग्रामस्थ महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी करावी लागणारी वणवण वाढली आहे.

# पोहताना काळजी घ्या

पोहणे हा फिटनेससाठी एक उत्तम खेळ आहे. सुट्टीत तुम्हीही पोहायला शिकण्याचा विचार करत असाल. मात्र त्याआधी सुरक्षेचे काही नियम अवश्य जाणून घ्या. या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

सर्वप्रथम जलतरण तलावाच्या भिंतींवर वा फलकावर लिहिलेले नियम काळजीपूर्वक वाचा आणि त्यांचे पालन करा. कारण ते तुमच्या रक्षणासाठी असतात. दुसरे म्हणजे स्विमिंग पूल स्वच्छ आणि जंतूमुक्त असल्याची खात्री करा. तुम्ही पूलमध्ये पोहत असाल तर पाण्याच्या पातळीच्या खुणा वाचा आणि त्यानंतरच उडी मारा. खेरीज पोहू नका, तीक्ष्ण खडक, डुंबू नका अशा सुचना देणारी चिन्हे लक्षात घ्या. खुणांचा नेमका अर्थ समजून घ्या.



**फन टाईम**

नवशिके असताना खूप खोल पाण्यात पोहण्याचे धाडस कधीही करु नका. थोडे शिकल्यानंतर तुम्ही खुल्या पाण्यात पोहत असाल तर किनाऱ्यावर पोहण्यासाठी सुरक्षित अंतरावर आहोत की नाही हे तपासा. तलावाच्या सभोवतालची फरशा किंवा ती जागा अत्यंत निसरडे असू शकते. म्हणून स्विमिंग पूलच्या आसपास धावू नका. पूलमध्ये जाताना आणि बाहेर जाताना काळजी घ्या.

पाण्यात उतरताना आणि बाहेर पडताना रेलिंगचा वापर करा. पुष्कळदा तलावातून बाहेर पडतानाही मुले जखमी होऊ शकतात, त्यामुळे पूलमधील रेलिंग आणि पायऱ्या सावधगिरीने वापरा. तुम्ही डुबकी मारता तेव्हा पाणी खूप उथळ नाही आणि तलावामध्ये कोणतीही वस्तू नसल्याची खात्री करा.

# इंग्रजी सुधारायचं तर...




इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय स्तरावर बोलली जाणारी भाषा असल्यामुळे ती अवगत करुन घ्यायला हवी. या भाषेत प्राविण्य मिळवण्यासाठी काय करता येईल याविषयी...

**स्टडी टिप्स**

✻ इंग्रजीत संवाद साधण्यासाठी सतत इंग्रजी बोलत रहा. वाक्य उच्चारताना तसे हावभावही करा. म्हणजे 'बिग' हा शब्द उच्चारताना दोन्ही बाजूंना हात पसरवा. यामुळे शब्द लक्षात रहायला मदत होईल.

✻ नवी भाषा शिकणं हे नवी सवय लावून घेण्यासारखं असतं. शब्द आणि वाक्य नीट बोलता यावी यासाठी ती भाषा कानांवर पडणंही गरजेचं असतं. यासाठी इंग्रजी वाहिन्या बघा. इंग्रजी बातम्या ऐका. चांगले इंग्रजी चित्रपट बघता येतील. इंग्रजी कॉमेंट्रीही ऐकता येईल. यामुळे वाक्यरचना कशी करायची, कोणते शब्द कुठे वापरायचे हे कळेल.

✻ मित्रमैत्रिणींचा ग्रुप करा. एखादा विषय निवडून त्यावर चर्चा करा. एखादी गोष्ट सांगा. आवडत्या विषयावर इंग्रजीत गप्पा मारा. मित्रमैत्रिणींसमोर बोलताना अवघडल्यासारखंही वाटणार नाही. यामुळे बोलण्याचा सराव होईल. आत्मविश्वास वाढेल.

✻ ताई, दादा, आई बाबा किंवा ओळखीत कोणाचं इंग्रजी चांगलं असेल त्यांच्याकडे जा. एखादा विषय निवडून त्यावर बोला. त्या व्यक्तीला चुका काढायला सांगा. व्याकरण किंवा उच्चारात झालेली चूक तुम्हाला कळेल आणि सुधारणा करता येईल. याबरोबरच इंग्रजी वाचन वाढवा. पेपर, पुस्तकं वाचा. यामुळे इंग्रजी सुधारेल.

# अनोखं क्विक सायक्लो कॉम्प्युटर




जगभरात सायकल चालवणाऱ्यांची संख्या वाढते आहे. व्यायाम म्हणून तसंच प्रदूषण कमी करण्यासाठी अनेक जण सायकल चालवतात. पण किती किलोमीटर सायकल चालवली, वेग किती होता ही माहिती आपल्याला मिळत नाही. ही गरज पूर्ण करण्यासाठी जपानमधल्या 'कॅट आय' या कंपनीने एक गॅझेट तयार केलं आहे. 'क्विक सायक्लो कॉम्प्युटर' असं त्याचं नाव आहे. या गॅझेटमध्ये छोट्या आकाराचा एलसीडी स्क्रीन बसवण्यात आला आहे. ते सायकलच्या हँडलला बसवलं की तुम्हाला सगळी माहिती मिळेल. सायकलची गती, सरासरी गती आणि सर्वाधिक गती यासंबंधीची नेमकी माहिती मिळू शकेल. तुम्ही किती किलोमीटर सायकल चालवली, किती वेळ सायकल चालवत आहात हे सुद्धा तुम्हाला कळू शकेल.

**स्मार्ट टॉक**

या गॅझेटमध्ये नाण्याच्या आकाराची एक छोटी बॅटरी बसवण्यात आली आहे. ते दिवसभरात तासभर वापरलं तर तुम्हाला एक वर्षाचा बॅटरी बॅकअप मिळतो. दुसऱ्या भाषेत सांगायचं तर दहा हजार किलोमीटर अंतर पार होईपर्यंत गॅझेटची बॅटरी बदलावी लागत नाही. यात वेदर प्रूफ बटण बसवण्यात आलं आहे. त्यामुळे पावसातही ते वापरता येतं. यात वायरलेस ॲनालॉग स्पीड सेन्सर तसंच व्हील मॅग्नेट आहे. यामुळे ते खराब वातावरणातही कार्यरत रहातं.

# व्हा इन्फॉर्मेशन मॅनेजर

सध्याच्या डिजिटल युगात लायब्ररियन्स इन्फॉर्मेशन मॅनेजर झाले आहेत. लोकांसोबत काम करायला आवडत असेल, माहिती–तंत्रज्ञानाची आवड असेल तर तुम्हीही इन्फॉर्मेशन मॅनेजर बनू शकता.

**कोण होणार?**

✻ पुस्तकं सर्व्हरवर योग्य पद्धतीने मांडणं, इंटरनेट सुरक्षेविषयीचं ज्ञान इन्फॉर्मेशन मॅनेजरला असायला हवं. ई–लायब्ररीमध्ये वाचकांपर्यंत माहिती पोहोचवण्याचं काम लायब्ररी मॅनेजर करतो. त्याच्याकडे माहितीच्या सर्व स्रोतांची योग्य मांडणी असायला हवी; लायब्ररीशी संबंधित साधनसामुग्रीचं व्यवस्थापन जमायला हवं.

✻ या क्षेत्रात येण्यासाठी वाचनाची आणि लोकांना भेटण्याची आवड हवी. कमी पैशांमध्ये जास्तीत जास्त पुस्तकांचा संग्रह करायला जमायला हवं. नव्या सॉफ्टवेअरची माहितीही हवी. सतत नव्या गोष्टी शिकण्यात रस हवा.

✻ लायब्ररी सायन्समध्ये डिप्लोमा तसंच पीएचडीपर्यंत विविध अभ्यासक्रम करता येतात. इतर विषयात पदवी मिळवल्यानंतरही लायब्ररी सायन्सचा अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. डिस्टन्स लर्निंगचा पर्यायही आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सरकारी लायब्ररी, विद्यापीठं, राजकीय दूतावास, फिल्म लायब्ररी, माहिती केंद्र अशा ठिकाणी नोकरी मिळू शकते.



# नेहमी सुरक्षित राहा



मुलांनो, तुम्ही एकटे सार्वजनिक ठिकाणी जाता का? याचे उत्तर हो असेल तर कमी गर्दी, निर्जन किंवा अंधारलेला रस्ता, रेल्वेच्या बोगीत किंवा बसमध्ये कमी प्रवासी असताना वा अज्ञात मार्गाने जाताना काळजी घ्यायला हवी. संकटाची शक्यता लक्षात घेऊन स्वतःचे संरक्षण करणे हाच उत्तम उपाय आहे. म्हणूनच स्वसंरक्षणाच्या हालचाली शिकण्यासोबतच अनोळखी ठिकाणी जाताना काही उपकरणे सोबत घेऊन जाणे शहाणपणाचे ठरेल. तुम्ही खूप वेळ बाहेर असणार असेल आणि कुठेतरी लांब किंवा अनोळखी जागी जात असाल तर नक्कीच कोणाला तरी सोबत ठेवा. यामुळे कोणत्याही कठीण प्रसंगांचा सामना करण्याची ताकद वाढेल. एकटेच जायचे असेल, तर निर्जन मार्गाऐवजी असा मार्ग निवडा जिथे बरीच वर्दळ आहे. वसतिगृहात किंवा एकट्या राहणाऱ्या मुलामुलींनी रात्रीच्या जेवणानंतर बाहेर फिरायला जाणे टाळावे किंवा घराजवळ असाल तरीही रस्त्यावरुन फोन करणे टाळावे. तुमच्या बोलण्यावरुन तर्क लढवून गैरफायदा घेतला जाऊ शकतो. तुम्हाला वाटत असेल की कोणीतरी पाठलाग करत आहे, तर लवकरात लवकर एखाद्या दुकान किंवा मॉलमध्ये जा आणि मदतीसाठी कॉल करा. कधीही अंधार असलेल्या ठिकाणी फार वेळ थांबू नका. अगदी मित्र–मैत्रिणी बरोबर असतील तरी अशा जागी फार वेळ रेंगाळणे टाळा. एकट्याने प्रवास करताना आजूबाजूच्या लोकांवर लक्ष ठेवा. त्यांच्यापैकी एखाद्याच्या कोणत्याही हालचाली शंकास्पद वाटत असतील तर दुसऱ्यांना मदतीसाठी विचारण्यास अजिबात संकोच करू नका. अशावेळी तुम्ही पोलिसांची वा सुरक्षा रक्षकांची मदत घेऊ शकता. असे कोणी दिसले नाहीत आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला तर तुम्ही आजूबाजूच्या लोकांनाही ही बाब सांगू शकता आणि त्यांची मदत मागू शकता. तुमच्या आजूबाजूला गर्दी असेल तर मोठ्याने ओरडू शकता. तुम्ही स्वत:साठी पावले उचलली तर लोक मदतीसाठी पुढे येतील.

**टेक केअर**

**जिज्ञासा**

# ओळखा पाहू...

१) ऑकलंड हे शहर कोणत्या देशात आहे?
२) व्हॅली ऑफ किंग्ज कुठे आहे?
३) सोन्याच्या खाणींसाठी प्रसिद्ध असलेलं दक्षिण आफ्रिकेतलं शहर कोणतं?
४) मदर्स डे कधी असतो?
५) २०२२ चा फुटबॉल विश्वचषक कुठल्या देशात संपन्न झाला?
६) सर्वाधिक वेळा फुटबॉल विश्वचषक जिंकलेला देश कोणता?
७) जागतिक आरोग्य दिन कधी असतो?
८) सर्वात मोठा समुद्रपक्षी कोणता?
९) घरटं बांधणारा एकमेव साप कोणता?
१०) मधमाश्यांना पंखांच्या किती जोड्या असतात?

उत्तर : १) न्यूझीलंड २) इजिप्त ३) जोहान्सबर्ग ४) मे महिन्याचा दुसरा रविवार ५) कतार ६) ब्राझील ७) ७ एप्रिल ८) अल्बाट्रॉस ९) किंग कोब्रा १०) दोन

# मेमरी कार्ड दुरुस्त करा




सध्याच्या स्मार्टफोनमध्ये बरीच मेमरी असते. पण आपण बरंच काही सेव्ह केलं तर ही मेमरीही संपून जाते. अशा वेळी फोनमध्ये मेमरी कार्ड टाकलं जातं. या कार्डवर बरंच काही सेव्ह केलं जातं. मेमरी कार्ड खराब झालं तर त्यावरचा डाटा मिळू शकत नाही. फोटो किंवा इतर महत्त्वाची माहिती डिलिट होते. मेमरी कार्ड खराब होण्याची अनेक कारणं आहेत. त्याविषयी जाणून घेऊ या. तसंच खराब झालेलं मेमरी कार्ड दुरूस्त कसं करायचं हे ही समजून घेऊया.

✻ स्मार्टफोनच्या वापरामुळे मेमरी कार्ड खराब होऊ शकतं. ब्राउजिंग करताना किंवा ॲप्स डाउनलोड करताना फोनमध्ये व्हायरस येतो. यामुळे मोबाईल आणि मेमरी कार्ड खराब होऊ शकतं. अँड्रॉइड ओएस सिस्टिमध्ये व्हायरस अगदी सहज प्रवेश करू शकतो. त्यामुळे अँड्रॉइड फोन वापरणाऱ्यांनी विशेष काळजी घ्यायला हवी.

**स्मार्ट टिप्स**

✻ मेमरी कार्ड दुरूस्त करण्यासाठी ते आधी कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपला कनेक्ट करा. कार्ड रिडरच्या मदतीने तुम्ही ते कनेक्ट करू शकता.

✻ यानंतर कंट्रोल प्लस आर ही कमांड द्या. आता ओपन झालेल्या विंडोत सीएमडी ही अक्षर लिहून एंटर करा.


✻ तुमच्या मेमरी कार्डचं नाव त्यात टाका. नाव टाकून एंटर करा.

✻ आता तुम्हाला एक मेसेज येईल. त्यात 'येस' साठी 'वाय' आणि 'नो' साठी 'एन' ही अक्षरं असतील.

✻ यापैकी 'वाय'वर क्लिक केल्यानंतर मेमरी कार्ड फॉरमॅट होईल. आता तुमचं मेमरी कार्ड सुरू होईल.

✻ या पद्धतीने मेमरी कार्ड दुरूस्त होईल. पण त्यावरचा डाटा मिळणार नाही. त्यामुळे कार्डवरचा डाटा लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर सेव्ह करून ठेवा.

**चित्र रंगवा**



# व्हॉट्सॲप ओळखणार फेक मेसेज

व्हॉट्स ॲपवर बरेच मेसेज, व्हिडिओ, पोस्ट्स येत असतात. पण त्यातला प्रत्येक मेसेज खरा असतोच असं नाही. त्यातली माहिती रास्त असतेच असं नाही. विविध कल्पना लढवून चुकीचा फोटो किंवा चुकीची माहिती टाकली जातो. दुसऱ्याच देशातला व्हिडिओ आपल्याकडचा आहे असं सांगून फसवलं जातं. असे फोटो, व्हिडिओ, मेसेज आपण फॉरवर्ड करतो. यामुळे चुकीची माहिती पसरते. त्यामुळे आपल्याला सावध रहायला हवं. आपल्याला आलेला मेसेज चुकीचा आहे हे ओळखायचं तरी कसं? यासाठी व्हॉट्स ॲपनेच एक टूल तयार केलं आहे. 'सस्पिशियस लिंक डिटेक्शन' असं या टूलचं नाव आहे. सध्या याची चाचणी सुरू आहे. त्यानंतर ते उपलब्ध करून दिलं जाणार आहे. हे टूल तुम्हाला आलेल्या मेसेजची लिंक तपासून तो खरा आहे किंवा नाही हे सांगू शकेल. या लिंकबद्दल व्हॉट्स ॲपला संशय आला तर त्याला सस्पिशियस लिंकचं लेबल लावलं जाईल. हा मेसेज फॉरवर्ड झाल्यानंतर त्यासोबत विशिष्ट संदेशही फॉरवर्ड केला जाईल. समोरच्या युजरला सूचना दिली जाईल. त्यामुळे मेसेज फॉरवर्ड करायचा किंवा नाही याचा निर्णय युजरला घेता येणार आहे. यामुळे चुकीचे मेसेज फॉरवर्ड होण्याचं प्रमाण कमी होईल अशी अपेक्षा आहे. असं असलं तरी भलतेच मेसेज फॉरवर्ड करायचे नाहीत तसंच कोणत्याही माहितीवर डोळे बंद करून विश्वास ठेवायचा नाही हे आपण ठरवायला हवं.




**स्मार्ट ॲप्स**

**ठिपके जुळवा**



# नितांतसुंदर थायलंड



थायलंड हा दक्षिण–पूर्व आशियातला खंडातला देश. बँकॉक ही त्याची राजधानी. थायलंडमध्ये पर्यटक मोठ्या संख्येने येतात. मलेशिया, बर्मा, लाओस आणि कंबोडिया या देशांच्या सीमा थायलंडला लागून आहेत. 'मुआंग थाई' हे या देशाचं अधिकृत नाव. पण जगभरात त्याची ओळख थायलंड अशीच आहे. थाई ही इथली अधिकृत भाषा तर लोकसंख्या ७० दशलक्ष एवढी. भात, कॉफी, साखर, मीठ, नारळ, रबर, साखर यांचं उत्पादन थायलंडमध्ये घेतलं जातं. वेगवेगळे उद्योगही इथे आहेत. मासेमारी, पेपरनिर्मिती, सिल्क आणि कॉटनच्या कपड्यांची निर्मिती, पर्यटन, हस्तकला, खाणकाम असे उद्योग इथे आहेत. थायलंडमध्ये बौद्धधर्मीय अधिक आहेत. बँकॉक, चियांग माई आणि पटाया ही इथली प्रमुख शहरं. थायलंडमध्ये आधुनिक आणि पारंपरिक जीवनशैलीचा मिलाफ पहायला मिळतो. इमारतीही पारंपरिक तसंच आधुनिक पद्धतीने बांधण्यात आल्या आहेत. बँकॉक हे थायलंडमधलं सर्वात गर्दीचं शहर. चाओ फराया नावाची नदी बँकॉकमधून वाहते. ही नदी इथल्या जलवाहतुकीचं केंद्र आहे. थायलंडमध्ये राजेशाही आहे. बँकॉकमध्ये सुंदर बौद्ध मंदिरंही आहेत. बँकॉक आणि देशाच्या इतर भागांमध्ये कालव्यांचं जाळं आहे. हा विविधतेने नटलेला असा देश आहे. थायलंडचा उत्तरेकडचा भाग डोंगराळ आहे तर दक्षिणेकडे घनदाट जंगल आहे.

**सफर देशांची**

**दोस्त हे मस्त**

## फ्लाईटलेस कॉर्मोरेंट

गॅलापॅगोस बेटांवर फ्लाईटलेस कॉर्मोरेंट हे पक्षी आढळतात. या पक्ष्यांची गणना अत्यंत दुर्मीळ प्रजातींमध्ये होते. अवघे १००० कॉर्मोरेंट शिल्लक राहिले आहेत. या पक्ष्याची पिसं काळ्या आणि करड्या रंगाची असतात. त्यांचे पंख आकाराने छोटे असतात. पण पाण्यात ते अत्यंत चपळतेने वावरतात. पावलं आणि पायांचा वापर करून ते समुद्राचा तळ गाठतात. मासे, ईल आणि ऑक्टोपस हे या पक्ष्यांचं मुख्य अन्न आहे.



**खादाडी**

## स्वादिष्ट ॲपल रेस स्नॅक्स

मुलामुलींनो, फळं खाण्यात थोडं ट्विस्ट आणलं तर? म्हणूनच आपण ॲपल रेस कार स्नॅक्स ही रेसिपी बनवू या. यासाठी चार मोठी सफरचंदं, १६ हिरवी द्राक्षं, १६ टूथपिक हे साहित्य घ्या. द्राक्षं अर्धी कापून घ्या. सफरचंदाचे चार तुकडे करा. आता सालाचा भाग वर ठेवा. आता टूथपिक घ्या. गरामधून टूथपिक आरपार जाऊ द्या. आता द्राक्षाचा अर्धा भाग दोन्ही बाजूंनी टूथपिकलाा लावा. सफरचंदाची गाडी तयार झाली!



**लाईफस्टाईल**

## दात घासताना...


सकाळी उठल्यावर आपण दात घासतो. दात घासण्याआधी ब्रश पाण्याने ओला करण्याची सवय काहींना असते. पण ही सवय चुकीची आहे. टूथपेस्टवर पाणी ओतल्याने तिची क्षमता कमी होते. यामुळे दातांचं नुकसान होऊ शकतं. दात घासल्यानंतर नीट चूळ भरायला हवी. दातांमध्ये टूथपेस्टचा अंश राहणार नाही याची काळजी प्रत्येकाने घ्यायला हवी.



**योगा टाईम**

## मांजरासारखं आसन

छोट्यांनो, योगासनांमध्ये मांजरासारखं आसनही आहे. यासाठी हाताचे पंजे आणि गुडघे खाली टेकवून प्राण्यांच्या स्थितीत या. पाठीला गोलाकार बाक यायला हवा. हनुवटी छातीजवळ नेण्याचा प्रयत्न करा. यामुळे चेहऱ्याचे स्नायू बळकट होतात.



# कलासक्त

# संगीतकार ए.आर. रेहमान

## मा. दिनानाथ मंगेशकर पुरस्काराने सन्मानित



**शरद कोरडे**

मा. दिनानाथ मंगेशकर स्मृती पुरस्कारासाठी यावर्षी दाक्षिणात्य संगीतकार ए.आर. रेहमान यांची निवड झाल्याचे जाहीर झाल्यावर अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. मा. दिनानाथांच्या नावाने दरवर्षी देण्यात येणारा हा पुरस्कार मराठी कलाकाराला मिळावा अशी अनेकांची अपेक्षा होती. पण या पुरस्कारासाठी संपूर्ण भारत हे कार्यक्षेत्र मानून त्याचा विचार केला जातो. राष्ट्र, त्यातील सर्वसामान्य जनता व समाजासाठी अभुतपूर्व, देदिप्यमान व अनुकरणीय योगदान दिलेल्या कलाकार व समाजसेवकाची निवड केली जाते. सन २०२२ सुरू झालेल्या पुरस्कारासाठी प्रथम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची निवड करण्यात आली होती. यानंतर सन २०२३ साली गायिका आशा भोसले यांची निवड करण्यात आली होती. यावर्षी जागतिक कीर्तीचे दाक्षिणात्य संगीतकार ए.आर. रेहमान यांची निवड झाली. तसे कार्य रेहमान यांच्या हातून झाले आहे. भारतीय संगीतात त्यांनी वेगवेगळे प्रयोग केले. भारतीय संगीतात त्यांनी वेगवेगळे प्रयोग केले भारतीय संगीत व पौर्वात्य संगीत यांचा मेळ घालून त्यांनी तालवाद्ये व तांत्रिक वाद्य यांचा समन्वय साधून संगीताला नवा आयाम दिला. तामीळ, मल्याळम, हिंदी, इंग्रजी, पारशी अशा विविध भाषेतील चित्रपटांना संगीत दिले व ते गाजले. ते स्वतः सर्व प्रकारची वाद्ये वाजवितात. कीबोर्ड, पियानो, हार्मोनियम, ड्रम, गिटार, अकॉर्डीयन, सिंथेन सायझर, हार्प आदी वाद्ये ते लहानपणापासून वाजवत असत. त्यांच्या या संगीत कौशल्यामुळे त्यांना Musical storm (संगीतातील वादळ) या नावाने संबोधित असत. त्यांना Mozart of Madras असेही म्हणत असत.

रेहमान यांचा जन्म तामिळनाडूतील मद्रास (आताचे चेन्नई) या शहरात झाला. त्याचे वडील आर. के. शेखर हे मद्रासमधील मुदलीखार कुटुंबातील होते. ते संगीतकार व संगीत संयोजक म्हणून काम करीत असत. त्यांच्या हाताखाली मदतनीस व वादक म्हणून रेहमान लहानपणापासून काम करीत असत. की बोर्ड हे त्यांचे आवडते वाद्य होते. खरे रेहमान यांचे मूळ नाव ए.एस. दिलीपकुमार असे होते व ते हिंदू कुटूंबातील मुदलीयार समाजातील होते. लहान वयातच वडिलांचे कॅन्सरच्या आजारामुळे निधन झाले. त्यावेळी एक सूफी संत त्यांच्या वडिलांवर उपचार करीत असत. त्यांच्या संभाषणाने छोटे दिलीपकुमार प्रभावित झाले. त्यांचे वडील मरण पावले तेव्हा ते नऊ वर्षाचे होते. घरातील आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांना घरातील वाद्ये उपजिवीकेसाठी विकावी लागली. आपण आत्महत्या करावी असे त्यांना प्रकर्षाने वाटू लागले. चेन्नईमधील पद्मा शेषाद्री बालभवनमध्ये ते प्राथमिक शिक्षण घेत होते. घरासाठी बाहेर कामाला जात असल्याने शाळेत ते गैरहजर असत. एक दिवशी शिक्षिकेने त्यांच्या आईला शाळेत बोलावून सांगितले की, 'या मुलाला कोदमबक्कम रस्त्यावर भीक मागायला सांगा पण याला शाळेत पाठवू नका.' आईने त्यांना शाळेतून काढले व एका माणसाच्या ओळखीने त्यांना मद्रास ख्रिश्चन हायर सेकंडरी स्कूलमध्ये प्रवेश मिळवून दिला. त्या शाळेत त्यांच्या संगीत साधनेला प्रोत्साहन मिळाले. वर्गमित्रांसह त्यांनी एक बँड तयार केला. या बँडच्या माध्यमातून त्यांनी शाळेच्या कार्यक्रमांतून व शहरातही अनेक कार्यक्रम केले. आपण पूर्ण वेळ संगीतात करियर करायचे ठरवून त्यांनी आपले जुने मित्र शिवमणी, जॉन अँथोनी, सुरेश पीटर, जो जो राजा यांच्यासह चेन्नईमध्ये एक रॉक ग्रुप तयार केला व स्कूल सोडली. सर्व वाद्ये त्यांना अगोदरपासूनच वाजवता येत होती, पण सिंथनेसायझर त्यांचे विशेष प्रेम होते. त्यानंतर मा. धनराज या संगीत शिक्षकाकडून त्यांनी रितसर शिक्षण घेतले. आपल्या वडिलांचे मित्र मल्याळम संगीतकार एम.के. अर्जुन यांच्यासोबत त्यांनी वादक म्हणून काम केले. त्यावेळचे संगीतकार एम.एस. विश्वनाथन, ईलाई राजा, रमेश नायडू, हंसलेखा आदींसोबत त्यांनी सहाय्यक म्हणून काम केले. इतकेच नव्हे तर तबला नवाझ झाकीर हुसेन व कुन्नाकुडी विजयनाथन यांच्या कार्यक्रमासाठी त्यांनी जगभर प्रवास केला. लंडनमधील ट्रिनिटी कॉलेजमध्ये त्यांना स्कॉलरशिप मिळाली. १९८९ मध्ये त्यांनी मल्याळम फिल्म 'रामोजीराव स्पिकींग' या चित्रपटासाठी प्रसिद्ध संगीतकार व गायक बालसुब्रमण्यम या संगीतकारासोबत काम केले. त्यापूर्वी एकदा त्यांची धाकटी बहीण खूप आजारी होती. डॉक्टरी उपचारांचा काहीही उपयोग होत नव्हता. रेहमान अनेक मंदिरात, दर्ग्यात व मशिदीत जाऊन प्रार्थना करीत होता. अचानक एक फकीर त्यांच्या घरी आला. त्याच्या उपचाराने बहिण आजारातून मुक्त झाली. त्यानंतर दिलीपकुमार सह त्याच्या सर्व कुटूंबाने १९८९ मध्ये इस्लाम धर्माचा स्वीकार केला व दिलीपकुमारचा अल्लाह रख्खा रहेमान झाला.दाक्षिणात्य निर्माते व दिग्दर्शक मणीरत्नम यांनी सन १९९२ मध्ये ए.आर. रेहमान यांना आपल्या 'रोझा' या चित्रपटासाठी संगीत देण्यासाठी आमंत्रित केले. दहशतवादी कारवायांवर आधारीत या चित्रपटात अरविंद स्वामी व मधु यांनी भूमिका केल्या होत्या. या तामिळ चित्रपटाच्या पुढे मल्याणम व हिंदी भाषेत आवृत्त्या निघाल्या. यातील गाणी खूप गाजली. त्यानंतर मणीरत्नम यांनी याच विषयावर आधारीत 'बॉम्बे' १९९५ व 'दिलसे' १९९८ या चित्रपटांच्या संगीतासाठी रेहमान यांचीच निवड केली. या दोन्ही चित्रपटांच्या गाण्यांनी खूप धमाल उडवून दिली. 'दिलसे' या चित्रपटांतील 'जियाँ जले' हे गाणे तर साक्षात लता मंगेशकर यांनी गाईले होते.ए.आर. रेहमान यांच्या संगीताचे वैशिष्ट्य म्हणजे गाण्याला संगीताच्या ढाच्यात घालतात. खोलवर विचार करण्याची पद्धत व प्रत्येक गाण्यात एक नवा प्रयोग करणे, वेगवेगळ्या वाद्यांचा वापर करताना पाश्चात्य वाद्ययंत्रे व भारतीय शास्त्रीय संगीत यांचा संगम ही खासियत होती. त्यांनी प्रत्येक गाण्यानुसार गायक निवडले आहेत. त्यात लता मंगेशकर, आशा भोसले, हरिहरन, कविता कृष्णमूर्ती, सुखविंदर सिंग, इला अरूण, सोनू निगम, अलका याज्ञिक, श्रेया घोषाल, उदित नारायण, स्वर्णलता यांच्या आवाजाचा सुरेख उपयोग करून घेतला. ए.आर. रेहमान यांना अनेक राज्यांकडून, भारत सरकारकडून व विविध चित्रपट संस्थाकडून अनेक पुरस्कार मिळाले आहेत. तामिळ फिल्मफेअरकडून त्यांना १७ पुरस्कार तर हिंदी फिल्मफेअरकडून त्यांना १० वेळा उत्कृष्ट संगीताचे पुरस्कार मिळाले आहेत. 'स्लम डॉग मिलेनियर' या चित्रपटासाठी त्यांना २ ऑस्कर ॲवार्ड मिळाले आहेत. भारत सरकारने 'पद्मभूषण' या पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. त्यामुळे तिसरा मा. दिनानाथ पुरस्काराने मानकरी होण्याचा त्यांना निश्चितच अधिकार आहे. ■ ■

**ए.आर. रेहमान यांनी हिंदीमध्ये हमसे है मुकाबला १९९४, राम गोपाल वर्मांचा 'रंगीला' १९९५, 'सुभाष घईंचा 'ताल' १९९९, फिजा २०००, 'लगान' २००१, 'साथिया' २००२, 'स्वदेश' २००४, 'मंगल पांडे' २००५, 'रंग दे बसंती' २००६, 'गुरू' २००७, 'जोधा अकबर' २००८, 'स्लम डॉग मिलेनियर २००९', 'दिल्ली-६ २००९', 'रॉकस्टार' २०११, 'मोहेन्जी डारौ' २००६, 'मॉम' २०१७, 'मिमी' २०२१, 'अमरसिंग चमविल्ला' २०२४ असे हिंदीमधील सुमारे १२२ चित्रपटांना संगीत दिले. ए.आर. रेहमान यांनी एकूण १७४ चित्रपटांला संगीत दिले. त्यात तामिळ, मल्याणम, तेलगु, हिंदी, इंग्रजी व पारशी भाषेतील चित्रपटांचा समावेश आहे.**

# 'गुलशन बावरा' एक अवलिया गीतकार



**श्रीराम शेटये**

**चित्रपट होता 'सट्टा बाजार' बलराज सहानी आणि मीना कुमारी सारखे दिग्गज कलाकार यात भूमिका करीत होते. एकदा चित्रपटाचे डिस्ट्रीब्यूटर शांतीलाल पटेल स्टुडिओत आले होते. तेव्हा त्यांनी चित्रपटाच्या गीतकाराला भेटण्याची ईच्छा व्यक्त केली. संगीतकार कल्याणजी आनंदजी यांनी गीतकाराला बाहेर बोलावले. किरकोळ बांधा, विस्कटलेले केस, रंगीबेरंगी कपडे बावळट चेहऱ्याचा एक मुलगा बाहेर आला. शांतीलाल पटेल त्याला बघताच शॉक झाले. ते म्हणाले, अरे ए तो बावरा है ,ए क्या गाने लिखेगा?**

चित्रपट सट्टाबाजार प्रदर्शित झाला 'तुम्हे याद होगा कभी हम मिले थे मुहब्बत के राह मे मिलके चले थे ' या गाण्याला सिनेरसिकांनी डोक्यावर घेतले. चित्रपटातील सर्वच गाणी हिट झाली. पण त्या दिवसापासूनच या गीतांचे गीतकार गुलशन मेहता यांचे नाव मात्र 'गुलशन बावरा' पडले. म्हणून चित्रपटाच्या पोस्टरवर आणि पडद्यावरही तेच नाव झळकू लागले.

१२ एप्रिल १९३७ साली लाहोर मधील शेखपुरा या गावी गुलशन बावरा यांचा जन्म झाला. लहानपणीच भारत-पाक फाळणी झाली. त्यावेळी झालेल्या जातीय दंगलीत त्यांच्या डोळ्या देखत त्यांच्या वडीलांची तलवारीने हत्या करण्यात आली. आईला बंदुकीची गोळी घालून ठार केले. गुलशन व त्याचा छोटा भाऊ शेतात लपून राहिल्यामुळे वाचले. मिलिट्रीच्या ट्रकमधून लपतछपत जयपुरला आपल्या बहिणीकडे आले व राहिले.

तेथे शिक्षण पूर्ण झाल्यावर ' गुलशन बावरा' मुंबईत रेल्वेमध्ये नोकरी करीत होते. गाण्यांची आवड होती म्हणून गाणी लिहून वेगवेगळ्या चित्रपट स्टुडिओत फिरून आपली गाणी संगीतकारांना दाखवत असत. अशावेळेस कल्याणजींना त्यांनी आपली गाणी दाखवली. कल्याणजींनी त्यांना 'चंद्रसेना' चित्रपटाची गाणी लिहिण्यासाठी संधी दिली. अशीच एक विलक्षण कहाणी आहे. सन १९७२ मध्ये प्रकाश मेहरांच्या 'जंजीर' चित्रपटाच्या गाण्यांची रेकॉर्डिंग फेमस स्टुडिओत सुरू होती. लता मंगेशकर आणि महमद रफी यांचे गाणे रेकॉर्डिंग चालू होते. संगीतकार होते कल्याणजी आनंदजी काहीवेळा टेक घेतल्यावर गाणे ओके झाले. परंतु लता मंगेशकर समाधानी नव्हत्या. लताजींना वाटत होते गाण्यात काहीतरी राहून गेले आहे. लतादीदीनी कल्याणजी आनंदजी ना गाण्याचा परत एक टेक घेण्यास सूचविले. कल्याणजी आनंदजी यांनी महमद रफी यांना परत एकदा रीटेक घेण्यास बोलावले.

परंतु, तो रमजानचा महिना चालू होता. रोजा चालू असल्यामुळे रफीसाहेबांनी निर्जल उपवास पकडला होता. अन्न पाण्यावाचून रफी साहेंबाचा घसा सुकला होता. रोजा सोडायला अजून एक तास बाकी होता. रफीसाहेब आपल्या गाडीत जाऊन बसले ते थोडे नाराजच होते. ओके झालेले गाणे परत का गायचे?

एवढ्यात गुलशन बावरा धावतच त्यांच्या मागे गेले. गुलशन बावरा म्हणाले, रफी साहब आप को मालूम है यह गाना किस पर फिल्माया जाना है? रफीसाहेब रागाने म्हणाले, क्या दिलीपकुमार पर पिक्चराईज्ड हो रहा है यह गाना?

तेव्हा गुलशन बावरा म्हणाले, आपके ईस खादिम पर! रफीसाहेब आश्चर्यचकित झाले. त्यांचा राग शांत झाला. अरे तुने पहले क्यु नही बताया? चल फटाफट स्टुडिओमे चल जेव्हा रफीसाहेब स्टुडिओत आले. तोपर्यंत संगीत वादक कलाकार स्टुडिओतून बाहेर आले होते. रफी साहेबांनी त्यांना परत आत बोलावलं. रफीसाहेब लता दीदीना सोबत घेऊन आत आले. असे काही गाणे गायले की गुलशन बावरा यांच्या व्यक्तीरेखेला ते फीट बसले. ते गाणे होते,दिवाने है दिवानो को ना घर चाहिए मुहब्बत भरी एक नजर चाहिए जंजीर चित्रपटात गळ्यात पेटी बांधून गाणे गाणारा तो अभिनेता ज्याच्यावर हे गाणे चित्रीत झाले आहे ते गुलशन बावरा आहेत. अमिताभ पोलीस इन्स्पेक्टर आणि जया भादूरी चक्कू सूरीला धार लावणारी गरीब मुलगी दाखवली आहे. अमिताभचा हा पहिला सुपरहीट चित्रपट होता.या चित्रपटाने अमिताभ रातोरात स्टार झाला. गुलशन बावरा यांची अनेक सुपरहीट गाणी आहेत. 'तुम्हे याद होगा कभी हम मिले थे मुहब्बत के राह मे मिलके चले थे ''सट्टा बाजार'(१९५९ ),'पंछी अभी तू है जाल मे ''नीली आखे'(१९६२), 'रूठे हो सनम तो फिर क्या है' हे 'लाल बांगला' (१९६६) मध्ये. 'चांदी की दिवार न तोडी प्यार भरा दिल तोड दिया' 'विश्वास' (१९६९) मध्ये. अशी अनेक सुपरहीट गाणी गुलशन बावरा यांनी लिहिली. उपकार चित्रपटातील त्यांचे ' मेरे देश की धरती सोना उगले उगले हिरे मोती ' हे महेंद्र कपूर यांच्या आवाजातील गाणे शतकातील सर्वोतम गीत आहे. हे देशभक्तीपर गीत आजही गाजत असते. 'गीत लिखना तो ईश्वर की देन है', असे गुलशन बावरा म्हणायचे. ■ ■

# साऊथच्या 'जेलर' चित्रपटाचा अल्ट्रा झकास

## मराठी ओटीटीवर वर्ल्ड डिजिटल प्रीमियर

**राम कोंडीलकर**

गुन्हेगाराला सुधारण्याची संधी मिळाली तर गुन्हेगाराच्या आयुष्यात काय बदल घडून येऊ शकतो, या विषयावर आधारीत 'जेलर' चित्रपटाचा 'अल्ट्रा झकास' या मराठी ओटीटीवर १९ एप्रिल २०२४ रोजी वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार आहे.

जेलर शांताराम याने सरकारला एक प्रस्ताव सादर केला आहे. ज्यात तो पाच गुन्हेगारांची निवड करेल. त्यांना एका ओसाड ठिकाणी घेऊन जाईल आणि त्या ओसाड जमिनीला हिरव्यागार शेतीत रूपांतर करून गुन्हेगारांना एका नव्या आयुष्याची सुरुवात करून देईल. सरकार हा प्रस्ताव मंजूर करते, परंतु, जर गुन्हेगारांनी कोणताही गुन्हा केला तर शांतारामला आपली नोकरी सोडून तुरुंगात जावं लागेल अशी अट घालते. जेलर शांतरामचा गुन्हेगारांना सुधारण्याचा प्रयत्न यशस्वी होईल का, हे चित्रपटात पहायला मिळणार आहे.

''मराठी रसिक प्रेक्षक आजवरच्या प्रत्येक चित्रपटाला भरभरून प्रतिसाद देत आहेत, याचा अर्थ त्यांना अल्ट्रा झकासचे चित्रपट खूप आवडत आहेत. प्रेक्षकांच्या शनोरंजनासाठी जेलर सारखा आणखी एक जबरदस्त दाक्षिणात्य चित्रपट प्रदर्शित करताना अत्यंत आनंद होत आहे.'' असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे सी.ई.ओ.सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले. ■ ■



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)